
विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

वर्ष तिसरे । अंक चौथा । एप्रिल २०२४





भारताचे संविधान

उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक,
भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य
घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार,
अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे
स्वातंत्र्य; दर्जाची व संधीची समानता;
निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये
व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;
आमच्या संविधानसभेत आज दिनांक सव्वीस
नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे
संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करुन स्वत: प्रत अर्पण करत आहोत.

''भारतीय लोक आपल्या तत्त्वप्रणालीपेक्षा देशाला मोठे मानतील की देशापेक्षा तत्त्वप्रणालीला मोठे मानतील? मला माहीत नाही. परंतु एवढे मात्र निश्चित की जर पक्षांनी स्वतःच्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले, तर आपले स्वातंत्र्य दुसऱ्यांदा धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही आणि कदाचित कायमचे घालवले जाईल. या संभाव्यतेविरुद्ध लढण्यासाठी आपण कटिबद्ध व्हायला हवे. आपल्या रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपण निर्धार केला पाहिजे.''

**– डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

महा. अंनिसचे

# विवेक जागर प्रकाशन

महा. अंनिसच्या विवेक जागर प्रकाशनाची आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीशी संबंधित पुस्तके ४० ते ५० टक्के सवलतीत उपलब्ध.

**भरघोस सवलत**

**कथा अंधश्रद्धांच्या, व्यथा माणसांच्या**
– डॉ. ठकसेन गोराणे । ₹ २४०

**चमत्कार एक भुलभुलैया**
–मच्छिन्द्रनाथ मुंडे । ₹ २३०

**फलज्योतिष : भ्रमातून वास्तवाकडे**
– डॉ. नितीन शिंदे । ₹ २००

**जोडीदाराची विवेकी निवड**
– संपा. आरती नाईक । ₹ १३०

**जातपंचायतींना मूठमाती**
– कृष्णा चांदगुडे । ₹ २२५

**ओळखा नवरत्नांचा विळखा**
– डॉ. नितीन शिंदे । ₹ ८०

**जादुई वास्तव**
– रिचर्ड डॉकिन्स । ₹ २५०

**सफर विश्वाची**
– डॉ. नितीन शिंदे । ₹ २००

**असाही विचार करायला काय हरकत आहे**
– डॉ. नितीन शिंदे । ₹ १२०

**यात असे आहे तरी काय?**
–डॉ. नितीन शिंदे । ₹ १२०

**अंतराळ समजून घेताना**
– डॉ. नितीन शिंदे । ₹ ११०

**दोस्ती ग्रहताऱ्यांशी**
– डॉ. नितीन शिंदे । ₹ ५०

**Friendship with stars and planets**
Dr. Pramod Ganganmale I Rs. 50

**मला बरं का वाटतं?**
– मच्छिन्द्रनाथ मुंडे । ₹ ११०

**भारतीय संविधानाचे अंतरंग**
– ॲड. एन. डी. सूर्यवंशी । ₹ ५०

**पृथ्वी मोलाचा माणूस**
– संपा. अरविंद पाखले, राजेंद्र कांकरिया । ₹ ३००

**सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा** – ₹ ३०

**सर्पविज्ञान**
– उल्हास ठाकूर, प्रकाश शहा । ₹ २५

**सर्पविज्ञान (हिंदी)**
– गजेंद्र सुरकार । ₹ २०

**संघटना मार्गदर्शिका - शाखास्तर**
– विनायक सावळे । ₹ २०

**अलौकीक शक्ती और पाखंड**
– मच्छिन्द्रनाथ मुंडे । ₹ ३०

**वैज्ञानिक दृष्टिकोन**
– प्रमोदिनी व कुमार मंडपे । ₹ २०

**संविधान प्रास्ताविका कॅलेंडर** – ₹ २५

**शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा फोटो**
– ₹ १०

**टेबल कॅलेंडर** – ₹ १२०

**कोविड साथीपासून बचाव**
– डॉ. अनंत फडके । ₹ २०

**अंधश्रद्धेची दुनिया, चमत्काराची किमया हिंदी भाग १ व २**
– मच्छिन्द्रनाथ मुंडे, कुमार मंडपे
– पा. न. निपाणीकर । ₹ ११०

**वास्तुशास्त्र : एक चिंतन**
– डॉ. नितीन शिंदे । ₹ १३०

**पत्रिका जुळवताना**
– डॉ. नितीन शिंदे । ₹ ५०

**वयात येताना - स्वतःला जाणूया!**
– डॉ. माधुरी झाडे । ₹ ८०

**विवेक जागर प्रकाशन**

धुळे । अविनाश पाटील, अध्यक्ष, महा. अंनिस व विवेक जागर संस्था, भास्कर, ८६, संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे, ४२४००१

**9527206057**

नवल ठाकरे । सहकार्यवाह, विवेक जागर प्रकाशन

विज्ञान निर्भयता नीती
विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

आम्ही वारस विवेकाचे

ISSN : 2584-0398

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

R.N.I.No. MAHMAR/2022/83669
**वर्ष तिसरे । अंक चौथा । एप्रिल २०२४**

## अनुक्रमणिका


- **संपादकीय...** ४
- **अभिवादन**
  - डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने/ नागसेन कांबळे ५
  - डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना / प्रा. अविनाश कोल्हे ७
  - फुले -आंबेडकरांच्या विवेकशील विचारांची गरज / डॉ. चंद्रशेखर भारती १०
  - राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन / गुणवंत डकरे १३
- **चिकीत्सा**
  - विद्यार्थी आणि पालकांमधील अंधश्रद्धा/ संजय देशपांडे १६
  - क्रीडा जगतातील अंधश्रद्धा / सुशीला मुंडे २०
- **जडणघडण**
  - ...आणि मला उत्तरे मिळू लागली / गणेश शेलार २३
- **अहवाल**
  - युवा संकल्प अभियान/हर्षल जाधव, गौरी जाधव २६
  - विवेकाचा आवाज राजस्थानात/उत्तम जोगदंड ३०
  - साहस-२०२४/अमृता जाधव ३२
- **महा.अंनिसची खबरबात** / अनिल शोभना वसंत ३३
- **गणितप्रेमी** / सूरज उर्मिला सुनील ३७
- **शब्दकोडे**/ उत्तम जोगदंड ३८


'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhshradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**संपादक मंडळ**

- **संपादक**
  डॉ. नितीन शिंदे
- **कार्यकारी संपादक**
  उत्तम जोगदंड
- **सहसंपादक**
  डॉ. श्यामसुंदर मिरजकर
- **व्यवस्थापकीय संपादक**
  अजय भालकर
- **सदस्य**
  डॉ. मांतेश हिरेमठ
  डॉ. बाळू दुगडूमवार
  प्रल्हाद मिस्त्री
  डॉ. सुशील मेश्राम
  डॉ. अरुण शिंदे
  तुकाराम शिंदे
  राजेंद्र फेगडे
- **सल्लागार मंडळ**
  किशोर बेडकिहाळ
  डॉ. प्रदीप पाटकर
  संध्या नरे-पवार
- **प्रकाशक**
  संजय बनसोडे
- **कार्यालयीन पत्ता**
  **अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका**
  'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव
  पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर
  ता.वाळवा जि.सांगली ४१५४०९
  मो. ९३५९०८०८२०
  email : manspatrika@gmail.com
  manspatrika@mans.org.in
- **अंक वितरण**
  आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
- **मुखपृष्ठ**
  सचिन भोसले, कोल्हापूर
- **स्वागतमूल्य** : ₹ २०/-
- **पृष्ठ संख्या** : ४०

**वार्षिक वर्गणी**
**४००** रू. (व्यक्तीसाठी) **५००** रू. (संस्थेसाठी)
**वर्गणी/देणगी पाठविण्याची सुविधा** :

विवेक जागर संस्था,
ICICI बँक, धुळे
**खाते नंबर** : 646301002757
IFSC Code : ICIC0006463
Scan & Pay

# ।। सं पा द की य ।।

सामाजिकदृष्ट्या अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्र कसा वेगळा आणि प्रगत आहे, हे सांगताना छ. शिवाजी महाराज, फुले-शाहू-आंबेडकर यांचे आपण पदोपदी नाव घेतो. अगदी प्रतिगामी आणि कट्टर उजव्या विचारांचे लोकसुद्धा नाइलाजाने का होईना ही नावे सतत उच्चारत असतात. तसेच ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, गाडगेबाबा, तुकडोजी अशा या संतांचा वारसादेखील आपण सदैव मिरवतो. या सर्व संत, समाजसुधारकांच्या जयंत्या, मयंत्या आपण साजऱ्या करतो. परंतु त्यांच्या विचारांचा जागर करण्याऐवजी त्यांना देवत्व बहाल करून टाकतो. छ. शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्यावेळी त्यांची आरती गायली जाते हे अगदी अलीकडचे उदाहरण आहे. समता, बंधुता, न्याय, स्वातंत्र्य या संवैधानिक मूल्यांचा संदेश देणाऱ्या, मानवतेची पताका फडफडत ठेवणाऱ्या या महामानवांचे विचार दडपून टाकण्यासाठीच तर त्यांना जाणीवपूर्वक देवत्व बहाल केले जात नाही ना, असा संशय गेल्या काही काळातील राजकीय आणि सामाजिक वाटचालीचे निरीक्षण केले असता येतो. राजकीय स्वार्थासाठी धार्मिक, जातीय, भाषिक, वांशिक, प्रांतिक आधारावर लोकांमध्ये विद्वेष निर्माण करून, महामानवांना त्यांच्या जातीतच कुंठित करणे, या प्रकारामुळे देशाच्या विविधतेतील एकतेला तडा दिला जात आहे. धार्मिक भावना टोकदार केल्याने अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी-प्रथा-परंपरा यांचा कशी नव्हे एवढा प्रादुर्भा झालेला आहे. संविधानास अभिप्रेत असलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार आणि प्रसार करणे हा अपराध घोषित केला जाईल की काय, अशी स्थिती निर्माण झालेली आहे. अगदी गेल्या महिन्यात ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील करवेळे या गावी एका वृद्धास भुताळ्या असल्याचा आरोप करून त्यास जळत्या निखाऱ्यांवर चालण्यास भाग पाडले गेले. त्याला मारहाण केली गेली. या प्रकरणी महा. अंनिस टीमने लक्ष घातले आहेच. परंतु हे सारे भीषण वर्तमान पाहताना या महापुरुषांची आणि त्यांच्या विचारांची, विशेषतः संत तुकडोजी महाराज यांच्या एका अत्यंत आर्तपणे केलेल्या भजनाची प्रकर्षाने आठवण येते.

‘या भारतात बंधुभाव नित्य वसू दे । दे वरचि असा दे ।।’

या भजनात धार्मिक, जातीय, आर्थिक भेदभाव दूर व्हावेत, सर्वांना स्वातंत्र्य लाभावे, सर्वांमध्ये मानवता, राष्ट्रभावना वाढावी, तरुण उद्योगी, शीलवान, शूर असावेत, अस्पृश्यता नष्ट व्हावी, खल-निंदक लोकांच्या मनामध्येही न्याय आणि सत्य वसावे; तसेच विपत्ती, भीती नष्ट होऊन घराघरांत सौहार्द नांदावे अशी कामना केलेली आहे. हा आहे आपला खरा वारसा. छ. शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत तुकडोजी महाराज, महर्षी धोंडो केशव कर्वे, वर्धमान महावीर, महर्षी वि. रा. शिंदे यांच्या विचारांचा खऱ्या अर्थाने जागर करण्याची हीच अगदी योग्य वेळ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती कशी साजरी करावी याबाबत मोलाच्या सूचना करणारा मा. नागसेन कांबळे (सरचिटणीस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समिती) यांचा विशेष लेख या अंकात आम्ही आवर्जून आहे. या लेखात केलेल्या सूचना सर्वच महामानवांच्या बाबतीत लागू होऊ शकतात.

येऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराच्यावेळी स्वार्थासाठी देशाची सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक वीण उसवण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात करण्याची शक्यता आहे. त्यांच्या पितृ-संघटना त्यात यशस्वी झाल्या, तर समाजजीवनावर त्याचा दीर्घकालीन परिणाम होईल. हे थोपवण्याचे मोठे काम महा.अंनिस आणि समविचारी संघटनांना करायचे आहे. अशा संघटनांची ताकद या राजकीय चक्रीवादळापुढे क्षीण असली तरी लोकशाहीर वामनदादा कर्डक यांचा संदेश चळवळीस निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

‘तुफानातले दिवे, आम्ही तुफानातले दिवे,
तुफान वारा पाऊस धारा, मुळी न आम्हा शिवे,
हल्ल्यावरती होती हल्ले, अभंग अमुचे बालेकिल्ले,
असाच ताठर माथा अमुचा, जरा न खाली लवे.
जळू परंतु धरती उजळू, प्रकाश येथे असाच उधळू
सदा चांदणे सुखी नांदणे, हेच आम्हाला हवे.’

महामानवांना आणि त्यांच्या विचारांना अभिवादन करत तुफानातले दिवे होऊन विवेकाचा आवाज बुलंद करू या!

अतिथी संपादक
**उत्तम जोगदंड**

महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने



**नागसेन कांबळे** । मुंबई
९८१९४९०८६८

स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या तत्त्वावर आधारित समाजरचना निर्माण करण्यासाठी अहोरात्र मेहनत करून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वत:च्या प्रकृतीची पर्वा न करता भारताचे संविधान निर्माण केले. त्याद्वारे सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक, न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा आणि उपासना यांची स्वतंत्र दर्जाची आणि संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तींची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा संविधानाद्वारे भारतीयांना हक्क प्राप्त करून दिला आहे.



भारताच्या या महान सुपुत्राची कीर्ती जगभर पोहचल्यामुळे आजमितीस देश-विदेशातील मानवसमाज त्यांच्या प्रेरणादायी विचारांना आदर्श मानून यशस्वी भारत जीवनयापन करण्याचा प्रयत्न करीत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जीवनभर विविध क्षेत्रांमध्ये महान कार्य करून भारत देशाची अविरत सेवा केली आहे. त्यांच्या शैक्षणिक जीवनाचा विचार केल्यास समजते की, जगप्रसिद्ध ऑक्सफर्ड विद्यापीठाने संशोधन केलेल्या जगातील शंभर बुद्धिवंतांच्या यादीत प्रथम नाव प्रकांडपंडित डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणजे महान संशोधक, तत्त्वचिंतक, विचारवंत, मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, जलतज्ज्ञ, कृषितज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ आणि एक महान देशभक्त होते. भारताचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी त्यांनी उत्तरेकडील सर्व नद्या दक्षिणेकडे वळवा, अशी संकल्पना मांडली होती. छोटे-छोटे राज्य प्रशासनासाठी व विकासासाठी आवश्यक असल्याची भूमिका मांडणारे ते एक प्रथम भारतीय होते.

बाबासाहेबांना शिक्षण घेण्यासाठी अनेकदा अपमान सहन करावा लागला. तरीही त्यांनी कष्टमय परिस्थितीत आपले शिक्षण पूर्ण केले. माझ्यासारखा त्रास माझ्या अनुयायांना भोगण्याची वेळ येऊ नये, यासाठी त्यांनी १९४५ मध्ये 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी शिक्षण संस्थेची' स्थापना केली. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा प्रभाव विदेशातल्या अनेकांवर पडला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक आणि मानव अधिकाराबाबतचे कार्य दक्षिण-पूर्व हंगेरी आणि उत्तर-पूर्व हंगेरी येथे खूप मोठ्या प्रमाणात सुरू आहे. आज भारतातील नवीन पिढीला अमेरिकेचे आकर्षण आहे, तर अमेरिकेतील नव्या पिढीला बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांमुळे भारताचे आकर्षण आहे. येणाऱ्या काळात जगातील तरुणांचे आदर्श डॉ. बाबासाहेब आंबेडकर असतील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या मानवमुक्तीच्या लढ्याला जगात तोड नाही. त्यांचे जीवनकार्य मानवी स्वातंत्र्याच्या इतिहासाचे सुवर्ण पान आहे. रक्ताचा एक थेंबही न सांडता जनसामान्यांच्या जीवनात आर्थिक, राजकीय व सामाजिक जीवनामध्ये आमूलाग्र बदल घडून आणणे म्हणजेच लोकशाही, अशी लोकशाहीची नवी व्याख्या जगापुढे मांडली. अशा या महामानवाचा जन्मदिवस म्हणजे १४ एप्रिल अर्थात डॉ.

बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव. या महामानवाची जयंती साजरी करताना एक अनुयायी म्हणून निश्चितच खबरदारी घेणे गरजेचे आहे. आपण उत्सवप्रिय तर होत नाही ना, याबद्दल चिंतन होणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वत: म्हणतात की, ''माझ्या नावाचा जयजयकार करण्यापेक्षा मी सांगितलेल्या गोष्टी जर तुम्ही प्राणपणाने पाळाल, तरच तुमचा उद्धार होईल.'' त्यामुळे केवळ त्यांच्या नावाचा जयजयकार करणे अर्थहीन ठरेल. अनुयायी त्यांनाच म्हणता येईल, जे कोणी महामानवाच्या विचारांचे अनुसरण तथा अनुकरण करतील. आपण जसे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना गुरू मानतो; तसेच त्यांनी सुद्धा भगवान गौतम बुद्ध, संत कबीर, महात्मा जोतिबा फुले यांना गुरू मानले होते. परंतु त्यांनी आपल्या गुरूंचा केवळ जयजयकार केला नाही. बाबासाहेबांची 'गुरू संकल्पना' बौद्धिक स्वरूपाची होती. कितीतरी चिंतनाच्या झुंजीनंतर, परीक्षणानंतर त्यांनी आपल्या युद्धस्वी आयुष्याचे गुरुत्व या गुरुत्रयीला बहाल केले. ही गुरुत्वाची प्रक्रिया प्रगल्भ विचारांची व चिंतनाची आहे. यामधून बाबासाहेबांच्या आयुष्याला तात्त्विक अधिष्ठान प्राप्त झाले आहे. त्यामुळे भक्त आणि अनुयायी यामधील फरक आपण समजून घेऊन त्यांच्या महान विचारांचे पाईक बनले पाहिजे. अनुयायी हे गुरूने-महापुरुषाने सांगितल्याप्रमाणे वागत असतात, तर भक्त हे त्यांना मूर्ती, फोटो व पुतळ्यात बंदिस्त करून त्यांची पूजाअर्चा करण्यात धन्यता मानतात. अनुयायी गुरूंनी-महापुरुषांनी दिलेला विचार समजून घेऊन व आचरणात आणून समाजात त्याचा प्रचार-प्रसार करीत असतात. प्रबोधनाची चळवळ गतिमान करण्याचे महान कार्य हे अनुयायी करीत असतात. आंबेडकर अनुयायी म्हणजे बुद्धिवादाचा विचार, स्वातंत्र्य-समता-न्यायाचा स्वीकार, जातीय विषमतेचा नकार, समाज प्रबोधनाचा निर्मळ झरा, प्रज्ञा, शील, करुणेचा पाईक आणि या सर्वांचा एकत्र संगम म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. अशा या प्रज्ञासूर्याचे आपण अनुयायी आहोत काय? या गोष्टीचे स्वपरीक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आचरणात आणणे, हीच त्यांची खरी जयंती ठरेल. जीवनभर कच्चे आंबेडकर अनुयायी बनून जगण्यापेक्षा सच्चे आंबेडकर अनुयायी बनून त्यांच्या विचाराची ज्योत मनामनांत पेटविण्यास कटिबद्ध होण्याचा संकल्प करणे, हीच खरी जयंती ठरेल. निरर्थक होणारा खर्च आणि उत्सवप्रिय मानसिकता या संदर्भात १९५४ मध्ये म्यानमार या देशात आयोजित जागतिक बौद्ध परिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनात बाबासाहेबांचे ऐतिहासिक भाषण झाले होते. त्या भाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'जगातील अनेक राष्ट्रांत बुद्धधम्म प्रचलित असला तरी देखील त्याचा प्रसार जितक्या झपाट्याने व्हायला पाहिजे होता तेवढा झालेला नाही, असे मला खेदाने म्हणावे लागते.'

'आज इथे हजर असलेल्या सर्व राष्ट्रांमध्ये श्रीलंका आणि म्यानमार ही दोन राष्ट्रे बुद्धधम्माभिमानी या दृष्टीने बरीच आघाडीवर आहेत, असे दिसते. परंतु माझ्या दृष्टीने या दोन्ही राष्ट्रांची बौद्धधम्माच्या प्रचाराची कार्यपद्धती अगदीच वाखाणण्याजोगी नाही. श्रीलंकामधील श्रीमंत स्त्रियांदेखील खूप दान देतात. धम्माच्या नावाने जमा होणारे रुपये ते वार्षिक उत्सव प्रसंगी निरर्थक खर्च करतात. घरादारांना व झाडांना विजेचे दिवे लावून हवी ती आरास करण्यास हे पैसे खर्च होतात. त्याऐवजी जमा झालेल्या पैशातून बौद्ध धम्माचा प्रचार झाला पाहिजे.' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणाचा संदर्भ मी एवढ्यासाठीच देत आहे, की सध्या महापुरुषांच्या जयंत्यांवर होणारा अर्थहीन खर्च आपण नक्कीच टाळला पाहिजे. देशात एकीकडे उपासमारी, बेरोजगारी यामुळे देशाचे मोठे नुकसान होत असताना आपण उत्सवप्रिय होऊन नको तो अनाठायी खर्च करणे कितपत योग्य आहे? यापेक्षा जयंतीच्या निमित्ताने जमा होणाऱ्या पैशातून अनाथ मुलांचे शिक्षण, उपासमारीने मरणाऱ्यांना सर्वतोपरी मदत, गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारणे, बेरोजगरांना नोकरीसाठी मदत, महापुरुषांच्या लोकोपयोगी ग्रंथांचे मोफत वाटप तसेच गरिबांसाठी मोफत रुग्णालय इत्यादी कार्य करणे, हीच खरी महामानवांची जयंती ठरेल. आपणास डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतिनिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा. नमो बुद्धाय, जयभीम!

**(लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस आहेत.)**

●



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना

**प्रा. अविनाश कोल्हे** । मुंबई
९८९२१०३८८०

विसाव्या शतकात जागतिक पातळीवर विविध देशांच्या राज्यघटनांच्या संदर्भात सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'भारतीय राज्यघटना' होय. हे विधान आता अनेक पातळींवर मान्य झालेले आहे. राज्यघटना समितीवरील सभासदांची निवड १९४६ साली तत्कालीन प्रांतीय सदस्यांद्वारे करण्यात आली. या सभासदांची मिळून जी राज्यघटना समिती तयार झाली त्या समितीने आपल्या देशाची राज्यघटना बनवली आहे. या समितीत देशभरातून निवडून आलेले सुमारे तीनशे सभासद होते. घटनासमितीने नंतर आपल्या अंतर्गत सुमारे आठ वेगवेगळ्या विषयांवरील समित्या बनवल्या. यातील शेवटची समिती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखालील 'मसुदा समिती', जी २९ ऑगस्ट १९४७ रोजी म्हणजे देश स्वतंत्र झाल्यानंतर पंधरा दिवसांनी गठित केली गेली. या मसुदा समितीने २ वर्ष, ११ महिने आणि १८ दिवस काम करून राज्यघटनेचा जो मसुदा अंतिम केला तो राज्यघटना समितीने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी मान्य केला. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तयार झालेली राज्यघटना आपण तब्बल दोन महिन्यांनी म्हणजे २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आणली. म्हणून दरवर्षी आपण '२६ जानेवारी' हा 'प्रजासत्ताक दिन' साजरा करतो. राज्यघटना बनवण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाचा सिंहाचा वाटा होता.

आपली राज्यघटना घटनासमितीने तयार केलेली आहे. घटनासमितीची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी दिल्लीत झाली होती. त्यानंतर अनेक बैठका झाल्या आणि २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताची राज्यघटना घटनासमितीने स्वीकृत केली म्हणून आपण '२६ नोव्हेंबर' हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा करतो. घटना जरी २६ नोव्हेंबर रोजी तयार झालेली होती तरी आपण '२६ जानेवारी' या दिवसापासून तिची अंमलबजावणी सुरू केली. याचा अर्थ, घटना तयार असूनही तब्बल दोन महिन्यांनी त्यानुसार देशाचा राज्यकारभार सुरू केला. कारण आपल्याला '२६ जानेवारी' या दिवसाचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करावयाचे होते. आपल्या देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत या दिवसाला एक वेगळा असा इतिहास आहे. डिसेंबर १९२९ मध्ये लाहोर येथील रावी नदीच्या किनारी काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. आपल्या स्वातंत्र्यलढ्यात या अधिवेशनाचे फार महत्त्व आहे. या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी पंडित जवाहरलाल नेहरू हा चाळीस वर्षाचा तरुण नेता होता.



नेहरूंनी अधिवेशनात 'संपूर्ण स्वराज्या'ची मागणी करणारा ठराव मांडला होता. ही महत्त्वाची घटना होती. तोपर्यंत काँग्रेस 'स्वराज्यांतर्गत स्वराज्य' (डॉमिनियन स्टेटस) ची मागणी करत होती. आता त्याच काँग्रेसने संपूर्ण स्वराज्याची मागणी केली होती. एवढेच नव्हे, तर यापुढे दरवर्षी '२६ जानेवारी' हा दिवस 'संपूर्ण स्वराज्य दिवस' म्हणून साजरा करण्याचे ठरले. त्यानंतर स्वातंत्र्य मिळेपर्यंत काँग्रेसतर्फे दरवर्षी '२६ जानेवारी' हा दिवस 'संपूर्ण स्वराज्य दिवस' म्हणून साजरा होत असे. प्रत्यक्षात स्वातंत्र्य '१५ ऑगस्ट' रोजी आले. अशा स्थितीत २६

जानेवारीचे महत्त्व मागे पडले असते. म्हणून राज्यघटना लागू करण्याचा दिवस म्हणून २६ जानेवारीची निवड झाली. तोच दिवस आज आपण 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१–१९५६) यांनी ६५ वर्षांच्या छोट्याशा आयुष्यात अनेक लोकोत्तर कामे केलेली आहेत. त्यापैकी एक म्हणजे भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीतील प्रभावी सहभाग. राज्यघटना निर्मितीची ही प्रक्रिया व्यवस्थित समजून घेण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनक्रमाचा व त्या प्रक्रियेतील भूमिकेचा थोडक्यात परिचय असणे महत्त्वाचे आहे.

बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी बाबासाहेबांना १९१३ साली शिष्यवृत्ती देऊन अमेरिकेला उच्चशिक्षणासाठी पाठवले. तेथील कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी अर्थशास्त्र या विषयात पीएच.डी. मिळवली आणि नंतर ते पुढच्या शिक्षणासाठी जून १९१६ मध्ये इंग्लंडला गेले. लंडन येथील 'ग्रेज इन'मधून ते बॅरिस्टर झाले आणि एप्रिल १९२३ मध्ये भारतात परतले. हे तपशील लक्षात घेतले म्हणजे बाबासाहेबांचे बौद्धिक जीवन कसे विकसित होत गेले, याचा अंदाज येतो. याची पहिली चुणूक दिसली ती जानेवारी १९१९ मध्ये मुंबई येथे साऊथबरो समितीसमोर त्यांनी दिलेल्या साक्षीत. या साक्षीच्या जोडीला त्यांनी समितीला सुमारे पन्नास पानांचे निवेदन दिले होते. यात त्यांनी अस्पृश्यांना मतदानाचा अधिकार असावा, त्यांना निवडणूक लढवता आली पाहिजे, त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदारसंघ असले पाहिजेत, अस्पृश्यांचे अस्पृश्य प्रतिनिधी अस्पृश्य मतदारांनीच निवडले पाहिजेत आणि अस्पृश्यांच्या मतदारसंघात अस्पृश्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्वाच्या जागा दिल्या गेल्या पाहिजेत वगैरे मागण्या केल्या होत्या. या घटनेपासून डॉ.बाबासाहेब भारतीय समाजाच्या तसेच इंग्रज सरकारच्या नजरेत भरले. त्यापुढील त्यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्यातील उत्कर्ष बिंदू म्हणजे त्यांना सन्मानपूर्वक देण्यात आलेले राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्षपद.

कॅबिनेट मिशन योजनेनुसार राज्यघटना समितीसाठी जुलै १९४६ मध्ये भारतात त्याकाळी असलेल्या अकरा प्रांतांत निवडणुका झाल्या. यात जोगेन्द्रनाथ मंडल यांच्या मदतीने बाबासाहेब बंगाल प्रांतातून निवडून आले. पुढे बंगालची फाळणी झाली आणि बाबासाहेब ज्या प्रांतातून प्रतिनिधित्व करीत होते तो प्रांत पूर्व पाकिस्तानमध्ये गेल्याने बाबासाहेबांचे सदस्यत्व संपुष्टात आले. पण तोपर्यंत बाबासाहेबांनी घटनासमितीच्या झालेल्या विविध बैठकांत स्वतःच्या बुद्धीची चमक दाखवल्यामुळे काँग्रेसने पुढाकार घेऊन त्यांना मुंबई प्रांतातून घटनासमितीवर निवडून आणण्याचे ठरवले.

या संदर्भात सरदार पटेल आणि डॉ. राजेंद्र प्रसाद यांचा पत्रव्यवहार फार उद्‌बोधक आहे. Patel wrote to Mavalankar on July 5, 1947, 'Dr. Ambedkar's nomination has been sent to PM. I hope there would be no contest, and he would be returned unopposed so that he could come here on the 14$^{th}$. Rajendra Prasad similarly wrote earlier on June 30, 1947, to Kher, 'I am anxious that he should attend the next session of the Constituent Assembly from the 14th July and it is, therefore, necessary that he should be elected immediately'. (सरदार पटेल यांनी मावळणकर यांना ५ जुलै, १९४७ रोजी लिहिले की, 'डॉ. आंबेडकर यांचे नामनिर्देशन पंतप्रधानांकडे पाठविण्यात आले आहे. मला आशा आहे की, त्यांच्या विरोधात कोणीही उभे राहणार नाही आणि ते १४ जुलैपर्यंत घटनासमितीत पुन्हा बिनविरोध परततील'. त्याचप्रमाणे राजेन्द्रप्रसाद यांनी त्यापूर्वीच ३० जून १९४७ रोजी खेर यांना लिहिले होते की, 'यापुढे घटनासमितीच्या १४ जुलै रोजी होणाऱ्या बैठकीस उपस्थित राहता यावे, यासाठी मी उत्सुक आहे आणि म्हणून त्यांची ताबडतोब निवड होणे गरजेचे आहे'.) घटनासमितीत येण्याअगोदरपासून बाबासाहेबांची राजकीय भूमिका समाजासमोर यायला लागली होती. यातील महत्त्वाचे टप्पे म्हणून लंडन येथे १९३२ साली संपन्न झालेल्या तीन गोलमेज परिषदा म्हणता येतील. या परिषदांमध्ये बाबासाहेबांनी सातत्याने दलित समाजाचे हितसंबंध कसे जपले जातील याकडे लक्ष दिले. यासाठी त्यांचे प्रसंगी महात्मा गांधींशी मतभेद झाले. पण बाबासाहेबांनी महात्माजींचे दडपण न घेता मोकळेपणाने मतभेद व्यक्त केले. त्यामुळे गांधीजींचे दलित समाजाच्या हक्कांबाबत मतपरिवर्तन झाले.

बाबासाहेब घटनासमितीत सुरुवातीपासून होते. त्यांना ऑगस्ट १९४७ मध्ये घटनासमितीच्या अंतर्गत मसुदा समितीचे अध्यक्षपद देण्यात आले. बाबासाहेबांच्या मसुदा समितीने तयार केलेला मसुदा संपूर्ण घटनासमितीसमोर ४ नोव्हेंबर, १९४८ रोजी मांडण्यात आला. या मसुद्यात ३१५ अनुच्छेद आणि आठ अनुसूची होत्या. हा मसुदा सुमारे आठ महिने समाजासमोर होता. या दरम्यान यावर विस्तृत चर्चा झाली, अनेक आक्षेप घेण्यात आले. बाबासाहेबांनी आक्षेपांना अभ्यासपूर्ण उत्तरे दिली. या आक्षेपांतील महत्त्वाचा आक्षेप म्हणजे ही राज्यघटना नक्कल करून बनवण्यात आली आहे; यात १९३५ सालचा भारत सरकार कायदा तसेच जगातील अनेक देशांच्या राज्यघटनांतील कलमे आणली आहेत. बाबासाहेबांनी याला सडेतोड उत्तर दिले. ते म्हणाले, 'याबाबतीत असे विचारता येईल की, जगाच्या इतिहासात या घडीला तयार करण्यात आलेल्या राज्यघटनेत काही नवीन असू शकते काय? पहिली राज्यघटना तयार झाल्यापासून शंभर वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. त्यानंतर अनेक देशांनी राज्यघटना लिहून तिचे अनुकरण केले आहे. मसुदा समितीने तिचे कर्तव्य पार पाडताना दाखवून देण्यात येत असल्याप्रमाणे असे कोणतेही निर्बुद्ध आणि अंध अनुकरण केलेले नाही.'

राज्यघटनेच्या मसुद्याचे दुसरे वाचन १५ नोव्हेंबर, १९४८ रोजी सुरू झाले आणि १७ ऑक्टोबर, १९४९ पर्यंत चालले. या दरम्यान, बाबासाहेबांचे बुद्धिवैभव फार जोरकसरीत्या समोर आले. यातील चटकन आठवणारे उदाहरण म्हणजे एकल नागरिकत्वाचे. भारताचा नागरिक देशाचा नागरिक असतो, राज्याचा नाही. अमेरिकेत दुहेरी नागरिकत्व आहे. अमेरिकन नागरिक देशाचा तसेच राज्याचा नागरिक असतो. आपल्या देशात तसे नसावे, हा बाबासाहेबांचा आग्रह होता. एवढेच नव्हे, तर बाबासाहेबांच्या आग्रहामुळे घटनेच्या उद्देशपत्रिकेत 'बंधुता' हा शब्द समाविष्ट करण्यात आला. भारतासारख्या धर्म-जाती-जमातीत विभागलेल्या समाजात बंधुत्व किती महत्त्वाचे आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

याशिवाय बाबासाहेबांनी विविध (Writs) रिट्सबद्दल (वैधानिक आदेश) खास तरतूदी असाव्यात असा आग्रह धरला. रिट्समध्ये हेबियस कॉर्पस, मॅंडमस, प्रोहिबिशन वगैरे उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकार कक्षेत आणले. या रिट्समध्ये भारताची संसदसुद्धा बदल करू शकत नाही. यामुळे नागरिकांना त्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झाल्यास थेट उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते. बाबासाहेब रिट्सना 'राज्यघटनेचा आत्मा' म्हणायचे. याबद्दल प्रत्येक भारतीय नागरिकाने बाबासाहेबांचे आजन्म कृतज्ञ राहिले पाहिजे.

असाच एक महत्त्वाचा विषय म्हणजे चित्रपटांना भारतीय पातळीवर केंद्र सरकारतर्फे प्रदर्शित करण्याची परवानगी देणे. बाबासाहेबांनी ही बाब कलम '७० अ'द्वारे संघराज्य सूचीत समाविष्ट केली आहे. तेव्हा बाबासाहेब म्हणाले होते की, 'ही बाब जर राज्य सरकारांकडे सोपवली तर विविध राज्ये विविध निकष बनवतील. यामुळे एका चित्रपटाला एका राज्यात परवानगी मिळाली तर दुसऱ्या राज्यात मिळेल याची खात्री नसेल. अशा स्थितीत चित्रपट निर्मात्यांसमोर अडचणी उभ्या राहातील, त्यांना आर्थिक नुकसान सोसावे लागेल.' म्हणून ही परवानगी केंद्र सरकारने सर्व देशासाठी द्यावी, अशी बाबासाहेबांनी तरतूद केली.

बाबासाहेब अध्यक्ष असलेल्या मसुदा समितीने राज्यघटनेची उद्देशपत्रिका बनवली. ही उद्देशपत्रिका घटनासमितीसमोर १७ ऑक्टोबर, १९४९ रोजी चर्चेला आली. मसुदा समितीने तयार केलेल्या उद्देशपत्रिकेची सुरुवात 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांनी सुरू होत होती. यावर जेव्हा चर्चा सुरू झाली तेव्हा एच. व्ही. कामथ यांनी सूचना मांडली की, या शब्दांऐवजी उद्देशपत्रिकेची सुरुवात 'परमेश्वराच्या नावाने आम्ही भारतीय लोक'अशी असावी. हा केवल शब्दच्छल नव्हता तर भारतातील सार्वभौम सत्तेचा उगम काय, हा मुद्दा होता. येथील सार्वभौम सत्ता कोणाकडे? देशाच्या नागरिकांकडे की परमेश्वराकडे, याबद्दल भरपूर वादविवाद झाला आणि नंतर या दुरुस्तीवर मतदान घेण्यात आले. कामतांनी मांडलेली दुरुस्ती नामंजूर झाली आणि बाबासाहेबांच्या समितीने सुचविलेली 'आम्ही भारताचे लोक' अशी सुरुवात ग्राह्य धरण्यात आली.

**(पृष्ठ क्रमांक १२ वर )**



# फुले-आंबेडकरांच्या विवेकशील विचारांची गरज

**डॉ. चंद्रशेखर भारती ।** कल्याण
८८२२३ ३१०१०

महाराष्ट्रात फुले-शाहू-आंबेडकर यांचे नाव घेतल्याशिवाय एकाही राजकीय नेत्याचे भाषण पूर्णत्वास जात नाही. मात्र एक तरी राजकारणी या महापुरुषांच्या विचारांनुसार चालतो का? तर उत्तर 'नाही' असेच आहे. चालणं तर सोडा, परंतु त्यांच्या विचारांचा आदरदेखील करत नाहीत. असो! काही का असेना; सद्यस्थितीत फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विवेकशील विचारांची भारतीय समाजात पेरणी करणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

म. जोतिबा फुले, रा. शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे तीनही महापुरुष वेगवेगळ्या जातीचे आहेत. मात्र वर्णात शूद्र होते. राजर्षी शाहू महाराज मराठा असूनही त्यांनी कुणबी-मराठा समाजासह सर्वच बहुजन समाज व विशेषत: बहिष्कृत समाजास 'सामाजिक न्याय' देण्याचा सतत प्रयत्न केला. इंग्रजांचे राज्य व त्यांचा संस्थानांवर अंकुश असतानाही शाहू महाराजांनी आपले राजेपद वाचविण्यासाठी सामाजिक परिवर्तनाची दिशा बदलली नाही. त्यामुळे महात्मा फुलेंचे कार्य त्यांना पार पाडता आले. हाच वारसा पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चालवला. शाहू महाराजांनंतर अत्यंत ताकदीचा वैचारिक वारसदार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने त्यांना मिळाला.



आपल्या देशातील बहुजन समाजाला स्वतःचे आत्मभान नव्हते; की आपल्याला मानवी हक्क आहेत. अंधश्रद्धा व दैववादी भूमिकेतून तो स्वतःकडे बघत होता. त्याच्यावरील दैववादाचा व अंधश्रद्धेचा पगडा उतरवणे व त्यांची मानसिकता बदलवणे सहज, सोपे काम नव्हते. महात्मा फुलेंनी सर्वप्रथम बहुजन समाजाला या गर्तेतून बाहेर काढण्याचे कार्य केले. त्यासाठी त्यांनी इ.स.१८७३ मध्ये जातीय भेदभाव आणि अत्याचाराची जाणीव करून देण्यासाठी बहुजन वर्गातील लोकांसाठी 'गुलामगिरी' लिहिले. गुलामगिरी ही श्रमिकांच्या शोषणाची एक पद्धत आहे. ज्या व्यवस्थेत माणसांना कोणाची तरी मालमत्ता समजले जाते आणि बळाचा किंवा धाकाचा वापर करून काम करायला लावले जाते; ही मांडणी महात्मा फुलेंनी केली. हा इतिहास दिशादर्शक ठरला. ओबीसी व समस्त बहुजन समाज मोठ्या संख्येने जागृत करण्यासाठी अशा आत्मभान निर्माण करणाऱ्या चळवळीची गरज होती. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अशा चळवळी केल्या; की ज्यामुळे संपूर्ण समाज जागृत झाला आणि त्या दिशेने गेला. यातूनच बोध घेऊन त्यांचे आत्मभान जागृत होऊन समतावादी व विज्ञानवादी समाज निर्माण झाला.

मात्र तसे ओबीसींच्या बाबतीत घडले नाही. महात्मा फुलेंनी जसा 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहिला तसा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'शूद्र पूर्वी कोण होते?' हा ग्रंथ ओबीसी मराठा व समस्त बहुजनांना जागृत करण्यासाठी लिहिला. मात्र ओबीसी-मराठा हा समाज मानसिकरित्या मागासच राहिला. देव, नवस या कर्मकांडात अडकून पडला. ओबीसी तर महात्मा फुलेंना आपलं मानायला तयार नव्हता तर त्यांची ग्रंथसंपदा कुठून वाचणार? आणि राजर्षी शाहू महाराज यांचा फोटो दलित, बौद्ध यांच्या

घरात लावलेला असल्याने, मराठा त्यांना स्वीकारायला तयार नव्हता. अशा वेळी बामसेफ संघटनेतून तयार झालेले पुरुषोत्तम खेडेकर, प्रवीणदादा गायकवाड, प्रदीप सोळुंखे, श्रीमंत कोकाटे यांसारखे मराठा समाजातील लेखक-वक्ते तयार होऊन पुढे आले आणि त्यानंतर मराठा समाजात समतावादी, विज्ञानवादी वैचारिक घुसळण सुरू झाली. परंतु अजूनही साठ ते सत्तर टक्के मराठा समाज हा छ. शिवाजी महाराज आणि छ. शाहू महाराज यांच्या सर्वधर्मसमभाव या विचारांपासून कोसो दूर आहे. पाहिजे तसा विवेकवाद, समतावाद, विज्ञानवाद या मराठा आणि ओबीसी समाजात रुजलेला दिसत नाही. परंतु काही का असेना! महात्मा फुले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ज्ञानाच्या लढाईमुळे महाराष्ट्रात दलित, ओबीसी, मराठा या वर्गाला दैववाद, अंधश्रद्धा यापासून परावृत्त होण्यास मोठ्या प्रमाणात मदत झाली.

महात्मा जोतिरावांच्या शाळेत शिकणाऱ्या मुक्ता साळवे या केवळ बारा वर्षांच्या लहुजी वस्ताद साळवे यांच्या नातीने इ.स. १८५४ मध्ये 'मांग-महारांच्या दुःखाविषयी निबंध' लिहिला. ती लिहिते, 'जर आम्हास धर्मासंबंधी पुस्तके पाहण्यास मोकळीक नाही तर आम्ही धर्मरहित आहोत असे साफ दिसते. असे धर्म पृथ्वीवरून नष्ट होवोत व अशा धर्माचा अभिमान करावा असे आमच्या मनातदेखील येऊ नये.' पुढे जोतिरावांनी 'सत्यधर्मा'ची घोषणा इ. स. १८९० मध्ये केली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इ. स. १९५६ मध्ये हिंदू धर्माचा त्याग केला. हे आपण जाणतोच!

महात्मा फुलेंनी सर्वप्रथम भारतीय लोकजीवनाचा अभ्यास केला. भारतावर बळीराजा व शिवाजीराजा या दोन्ही राजांनी अत्यंत समतावादी व समानतावादी राज्यकारभार केला हे अभ्यासले. त्यांनी बहुजन समाजास 'बळीवंशीय' म्हटले. समाजावर छ. शिवाजी महाराजांची छाप होती. म्हणून जोतिराव मित्रांसमवेत इ. सन १८६९ मध्ये किल्ले रायगडावर गेले. शिवरायांची समाधी शोधून साफसफाई केली, पूजा केली. शिवरायांवर सुमारे साडेनऊशे ओळींचा प्रदीर्घ पोवाडा लिहिला. जगात सर्वप्रथम जोतिबांनी शिवजयंती इ. स. १८६९ पासून सुरू केली. तुकाराम महाराज व शिवरायांना गुरू मानून कार्य सुरू केले. बालविवाह बंदी, विधवा विवाह, स्त्रीशिक्षण, भ्रूणहत्या बंदी, विधवा केशवपन बंदी, सत्यधर्म विधी असे समाजास उपयुक्त व जिव्हाळ्याचे प्रश्न त्यांनी हाताळले. समता, न्याय, समानता, स्वातंत्र्य, बंधुता स्थापित करण्यासाठी जोतिराव-सावित्री यांनी बीज पेरले.

आज अनेक मराठा संघटना तसेच शिवसेनेसारखे पक्ष कार्यकर्ते मोठमोठ्याने 'जय शिवाजी, जय भवानी' हा नारा देत असतात. यातून कार्यकर्त्यांमध्ये, समाजामध्ये एक ऊर्मी, एक स्फूर्ती जागृत होते. मनातील जोश कृतीत दिसू लागतो. ऐकणाऱ्याचे भान हरपते. त्याच्यातही एक जोश संचारतो. परंतु हा नारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला, हे अनेकांच्या गावीही नसते. महाडच्या चवदार तळे सत्याग्रह क्रांतीतून ही घोषणा आली.

दिनांक २० मार्च १९२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे कार्यकर्ते चवदार तळे महाड येथे जमले होते. आंदोलन अत्यंत शांततापूर्ण व अहिंसक होते. तेवढ्यात विरोधक ब्राह्मण समाजाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व समुदायाविरोधात मोठमोठ्याने नारे लावण्यास सुरुवात केली. त्यांना अपमानजनक वाटावे, चीड यावी, असे प्रकार सुरू केले. त्यातील विकृत गटांनी दलितांच्या दिशेने विक्षिप्त हातवारे करण्यास सुरुवात केली. शांत असलेल्या मोठ्या दलित समाजातील तरुणांच्या मनात चीड निर्माण झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांना शांत राहण्यास सांगत होते. त्यातून वातावरणात अस्वस्थता निर्माण झाली. आपण संख्येने जास्त असताना मूठभर ब्राह्मण आपली निंदानालस्ती करत आहेत तेव्हा काही तरुणांनी अशा विकृत ब्राह्मण गटावर हल्ला करण्याचा मनोदय व्यक्त करून बाबासाहेबांकडे परवानगी मागितली. बाबासाहेब म्हणाले, 'अरे, मीही तरुण आहे. पण आपण न्यायाचे पालक व रक्षक आहोत. आपण छ. शिवाजी महाराजांचे मावळे व संत तुकारामांचे वारकरी आहोत; त्यांच्या विचारानेच आपले आंदोलन चालले पाहिजे व यशस्वी झाले पाहिजे. आपल्याला चीड यावी व त्यातून येथे दंगल व्हावी; असा ब्राह्मणी कावा आहे; जो आपण हाणून पाडलाच पाहिजे. पण ब्राह्मण गटास प्रत्युत्तर देण्यासाठी आपणही आपल्या जागेवरून मोठमोठ्याने नारे देऊ. ते असे, मी आधी म्हणेन 'जय शिवाजी' त्याच्या मागोमाग तुम्ही म्हणायचं 'जय शिवाजी, जय भवानी' त्यानंतर

दलित समुदायदेखील 'जय शिवाजी जय भवानी' अशा गर्जना करू लागला. अशा तऱ्हेने 'जय शिवाजी जय भवानी' चे नारे सुरू झाले आणि ब्राह्मणांची आपोआप पांगापांग झाली. एवढे ते हादरून गेले.

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार आणि कार्यातून प्रेरित होऊन भाई माधवराव बागल यांनी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांही गुरू-शिष्यांचा पुतळा कोल्हापूरच्या बिंदू चौकात दिनांक ९ डिसेंबर १९५० रोजी उभारला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हयातीतील हा जगातील पहिला पुतळा होता; जो एका मराठा व्यक्तीने उभारला होता. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांही गुरू-शिष्यांनी धर्माच्या आणि अंधश्रद्धेच्या गाळात अडकलेल्या अज्ञानी बहुजन समाजाला समतावादी, मानवतावादी, विज्ञानवादी वैचारिक वारसा देऊन बाहेर काढले. महात्मा फुलेंनी स्त्रियांना शिक्षण सुरू करून मुख्य प्रवाहात आणले. त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार प्राप्त करून दिला; तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना संविधानाद्वारे सबळ आणि प्रबळ बनवले. त्याचबरोबर स्त्री-पुरुष समानतेचा आणि विज्ञानवादाचाही पाया घातला. दोघांनाही जातिभेदाचे चटके सोसावे लागले. धर्ममूढांनी केलेल्या अपमानांनी ते अनेकदा घायाळ झाले, तरी ते डगमगले नाहीत. धर्म, धर्मग्रंथ, पुरोहित, कर्मकांड, पूर्वजन्म-पुनर्जन्म, ईश्वर, दैववाद या वर्णव्यवस्था व जातिव्यवस्थांना चिरंजीव करणाऱ्या मुळावरच त्यांनी घाव घातले. माणूस हा विज्ञाननिष्ठ व्हावा, आधुनिक मूल्यांचे त्यास भान यावे, त्याच्या हक्कांची माणुसकीची व अस्मितेची त्याला जाणीव व्हावी, विभूतीपूजेतून 'शब्दप्रामाण्य' ग्रंथप्रामाण्य यातून मुक्त होऊन तो निर्भय बनावा, या व्यापक उद्दिष्टाभोवतीच महात्मा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्व लढे केंद्रीभूत झालेले होते. हे इथे विसरता येणार नाही.

११ एप्रिला महात्मा फुले, तर १४ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिन. या दोघांही सम्यक सामाजिक परिवर्तनाची कृतिशील लढाई लढणाऱ्या गुरू-शिष्यांना जयंतिनिमित्त विनम्र अभिवादन.

**संदर्भ :**


१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ

२) फुले-शाहू-आंबेडकर, पुरुषोत्तम खेडेकर

३) समग्र महात्मा जोतिराव फुले

४) मूकनायक वृत्तपत्र

५) आंबेडकर क्रांतीचे तत्त्वज्ञान, निरंजन पाटील



**(लेखक महा. अंनिसच्या डोंबिवली शाखेचे अध्यक्ष आहेत.)**


●

---


**(पृष्ठ क्रमांक ९ वरून )**


अशा प्रकारे बाबासाहेबांनी अनेक प्रसंगी चर्चेत निर्णायक मते नोंदवून चर्चेची दिशा पुरोगामी विचारांकडे नेली. शेवटी २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी घटना मंजूर झाली. घटनेचा अंतिम मसुदा सादर करताना बाबासाहेबांनी घटनासमितीसमोर २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी केलेले शेवटचे भाषण लक्षात घ्यावे लागते. हे भाषण दीर्घ आहे. त्यात बाबासाहेब म्हणाले, 'आम्ही केवळ राजकीय लोकशाहीवर समाधान मानू नये. आम्ही आमच्या राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीची जोड दिली पाहिजे. सामाजिक लोकशाहीचा पाया असल्याशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकत नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय? सामाजिक लोकशाही म्हणजे जीवन जगण्याचा असा मार्ग की, जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना जीवनाची तत्त्वे म्हणून मान्यता देतो. या स्वातंत्र्य, समता, बंधुत्वाच्या तत्त्वांना त्रिकुटातील तीन वेगवेगळ्या बाबी समजण्यात येऊ नये. २६ जानेवारी, १९५० रोजी आपण एका विसंगतीपूर्ण जीवनात प्रवेश करणार आहोत. राजकारणात आपल्याकडे समानता असेल. पण सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपल्याकडे असमानता असेल. आमच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आम्ही किती काळ समानतेला नकार देणार आहोत?' बाबासाहेबांनी तेव्हा दिलेल्या इशाऱ्यांचा आजही आपल्याला विचार करावा लागतो; यातच बाबासाहेबांची दूरदृष्टी दिसून येते. त्याचप्रमाणे भारतीय प्रजासत्ताकाला अजूनही किती तरी मोठा प्रवास करायचा आहे, हेही लक्षात येते.


**(लेखक राज्यशास्त्र अभ्यासक व डी.जी.रुपारेल महाविद्यालय, मुंबईचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)**



●



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन

**गुणवंत डकरे** । वर्धा
९९२१५५१५४३

आज जगाच्या पाठीवर सर्वत्र स्त्रियांच्या प्रश्नांवर विचार होऊन ते सोडविण्याच्या दृष्टीने सर्वंकष जोरदार प्रयत्न होत आहेत. तरीसुद्धा महिलांचे स्वतंत्र अस्तित्व आपण अजूनही मनापासून स्वीकारलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. स्त्रीजीवनातील अन्यायाच्या निराकरणाचे प्रयत्न साधारणपणे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून सुरू झाले. हे प्रयत्न स्त्रीजीवनातील वेगवेगळ्या समस्यांच्या संदर्भात वेगवेगळे झाल्याचे दिसते. भारतीय स्त्रीजीवनावर अनेक समाजसुधारकांनी, विचारवंतांनी लेखन व कृतीतून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. यामध्ये प्रामुख्याने महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजा राममोहन रॉय, न्यायमूर्ती रानडे, आगरकर, महर्षी कर्वे, स्वामी विवेकानंद या व इतर थोर समाजसुधारकांनी, विचारवंतांनी स्त्रीजीवन सुधारणेचे भरपूर प्रयत्न केले. बालविवाह, पुनर्विवाह, सती जाण्याचा प्रश्न, सार्वत्रिक शिक्षणाचा प्रश्न धसास लावण्याचे प्रयत्न केलेत. स्त्रीच्या पारतंत्र्याचे मूळ तिच्या अज्ञानात आहे, हे ओळखून स्त्री शिक्षित झाल्याशिवाय तिला आपल्या सर्वांगीण गुलामीची जाणीव होणार नाही; अशी महात्मा फुलेंची मूलगामी विचारधारा होती व त्यानुसारच त्यांनी आपल्या काळात स्त्रीशिक्षणाला वेगाने चालना दिली. स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीच्या जीवनप्रणालीत कसे परिवर्तन होत गेले आणि सांप्रत काळात ही भारतीय नारी कशी असावी, याबद्दलची वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची भूमिका कशी होती, याबद्दलचा आढावा घेण्याचा त्यांच्या स्मृति दिनानिमित्त हा प्रयत्न.



'महिलोन्नती' या विसाव्या अध्यायात वंदनीय तुकडोजी महाराजांनी स्त्रीजीवनविषयक विचार मांडलेले आहेत. संतांनी, समाजसुधारकांनी, विचारवंतांनी, स्त्रीउद्धाराविषयीचा प्रयत्न अत्यंत उत्कटतेने केलेला दिसतो. त्यात वंदनीय महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन अत्यंत शास्त्रशुद्ध, पुरोगामी स्वरूपाचा दिसून येतो. स्त्रीचे समाजातील स्थान कसे आहे व ते कसे असावे याबद्दलचे विवेचन 'महिलोन्नती' या अध्यायात केलेले आहे. तुकडोजी महाराजांच्या मते, स्त्री आणि पुरुष दोन्हीही समाजजीवनातील समान असे महत्त्वाचे घटक आहेत. ती पुरुषापेक्षा कसल्याही बाबतीत तीळमात्रही कमी नाही, यासाठी महाराज ग्रामगीतेत सांगतात की,

'निरीक्षोनि जी जी घरे पाहिली।
तेथे सरसता अनुभवा आली।
चातुर्य लक्षणे अधिक दिसली। महिलांमाजी ।'
(ग्रा.गी.अ. २० ओवी ३१.)

स्त्रीचा गौरव करताना तुकडोजी महाराज म्हणतात –
'जिच्या हाती पाळण्याची दोरी। तीच जगाते उद्धरी।
ऐशी वर्णिली मातेची थोरी। शेकडो गुरुहुनिहि ।।'
(ग्रा.गी.अ. २० ओ. ३)

मातृपद हे जगातील सर्व पदात श्रेष्ठ पद आहे. स्त्री ही आपला संसार व कौटुंबिक जीवन सांभाळून घरात शांती प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते. तर मातेचे संस्कार अपत्यावर होत असल्याने ती एक नररत्नांची अपूर्व खाणच आहे, असे महाराज ग्रामगीतेत सांगतात–

'याच गुणे 'मातृदेवो भव'।
वेदाने आरंभीच केला गौरव।
नररत्नांची खाण अपूर्व। मातृजाति म्हणोनिया।।'
(ग्रा.गी.अ. २० ओ. ८)

पुरुष–स्त्री समान मानताना जो आदर पुरुषास मिळतो, त्याहीपेक्षा तो महिलांना अधिक मिळावा व म्हणून तुकडोजी महाराज सांगतात –

समाजी जो पुरुषासी आदर।
तैसाचि महिलांशी असावा व्यवहार।
किंबहुना अधिक त्यांचा विचार।
झाला पाहिजे समाजी।।
(ग्रा.गी.अ. २० ओ. ७८)

अशा प्रकारे महाराजांच्या मते स्त्रियांचा आदर झालाच पाहिजे. सोबतच परंपरागत स्त्रीजातीला अबला, गुलाम, भोगवस्तू, प्रगतीच्या मार्गातील धोंड असे म्हणणाऱ्यांना ग्रामगीतेतून रोखठोक उत्तर दिले आहे. ते लिहितात –

'काय देवे देवता भिन्न केल्या ?
ऋषि पत्न्या नव्हत्या सांभाळिल्या ?
काय महिलांत साध्वी नाही झाल्या ?
पाहा पुराणी मागच्या।।'
(ग्रा.गी.अ. २० ओ. ४९)

'काय स्त्रियांनी युद्ध नाही केले ?।
पतिपुत्रां नाही प्रोत्साहन दिले ?
काय स्त्रियांनी प्राण नाही अर्पिले। ब्रीदासाठी ?।।'
(ग्रा.गी.अ. ५० ओ. ५१)

एकूणच स्त्री ही अबला नसून सबला आहे व तिने आपल्या जीवनात विविध प्रकारच्या भूमिका सांभाळल्या आहेत असे महाराज दर्शवितात. महाराजांच्या मते, स्त्री–पुरुषांचे परमेश्वराने निर्मिलेले सूत्र म्हणजे दोघांना समान ठेवावे व संसार रथाची ही दोन्ही चाके समसमान ठेवून प्रपंच परमार्थमय करावा; कारण स्त्रीला भक्ती, ज्ञान, संयम, शहाणपण अशा सद्‌गुणांची निसर्गाकडूनच उपजतच प्राप्ती झाली आहे. ते ग्रामगीतेत म्हणतात –

'स्त्रीलाच भक्ती, स्त्रीलाच ज्ञान।
तिलाच संयम, शहाणपण।
तिच्यानेच हालती वाटे संपूर्ण। संसारचक्रे।।'
(ग्रा.गी.अ. २० ओ. ३३)

तुकडोजी महाराज म्हणतात, स्त्रीशिवाय पुरुषांच्या जीवनात पूर्णता येतच नाही. स्त्रीशिवाय संसार हा असार आहे. ते म्हणतात –

'म्हणोनि विधीने सेवन उचित बोलिले।
महिलेविण विश्व न चाले।
काय होते पुरुषाने केले ? अभद्र झाले घर सारे।।'
(ग्रा.गी.अ. २० ओ. १७)

स्त्रीशिक्षणाचे बाबतीत महाराजांचा दृष्टीकोन फार व्यापक आहे. जगसुद्धा स्त्रीला जर शिक्षण दिले तर ती पालटू शकते म्हणून ते म्हणतात –

महिलांच्या आंतरिक गुणांचा विकास।
करील ऐसे शिक्षण खास।
जरि दिले जाईल त्यांस।
तरीच भावी जग पालटे ।।८४।।

तसेच शिक्षण देताना मुले–मुली हा भेदभाव नसावा म्हणून ते लिहितात –

मी पाहिले मुले फार शिकती।
यंत्राविद, कारागीर होती।
परि मुलींसाठी योजना अति।
मंद आहे शिक्षणाची ।।८९।।

एकूणच मुलींच्या शिक्षणाबद्दल समाजामध्ये होत असलेला भेदभाव याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. समाजामध्ये मुलींच्या शिक्षणाबद्दल असलेली अनास्था त्यांना दूर करावयाची आहे, तर पुढे महाराज स्त्रीवर होत असलेल्या अन्यायाच्या बाबतीत स्त्रियांनीसुद्धा संघटित व्हावे, त्यांनी मेळावे घ्यावे व त्यांनी या संघटित ताकदीमधून अन्यायाचा प्रतिकार कसा करावा याची जाणीव करून देत ते ग्रामगीतेतून सांगतात–

जैसी मुलांची संघटित सेना।
तैसी स्त्रियांची असावी संघटना।
आपल्या सुखदुःखाच्या भावना।
प्रकटवाव्या सभा–संमेलनी ।।१०२।।
स्त्रियांचे स्वतंत्र मेळे–समुदाय।
त्यांच्या उन्नतीचा कला–गौरव।
प्रतिकाराचीहि त्यांना जाणीव।
अवश्य असावी ।। १०६।।

एकूणच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीतेतून एक आदर्श स्त्री कशी असावी व त्याकरिता समाजाकडून तिला कशी वागणूक मिळावी याचे यथार्थ विवेचन ग्रामगीतेतून केले आहे. ती पुरुषांचे बाबतीत तसूभरही कमी नाही. मात्र तिला संधी दिल्याच जात नाहीत; म्हणून आधी तिला संधी द्या, हे महाराजांना

अपेक्षित आहे आणि म्हणूनच समर्थ व्यक्तीच समर्थ समाज निर्माण करू शकतात, ही भूमिका स्त्रियांनी घेऊन आपल्या सामाजिक स्थानासाठी आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग अवलंबून समर्थ पर्याय अवलंबावा. आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर सर्व प्रकारच्या पुरुषसत्ताक अवडंबरांना आव्हान द्यावे आणि शिक्षण, रोजगार, आरोग्य, राजकीय सत्ता या सर्व क्षेत्रातल्या हक्कासाठी संघर्ष करावा. जसे वंदनीय महाराजांनी स्त्री-पुरुष समसमान लेखले त्याचप्रमाणे दुय्यमत्वाला नकार देऊन स्त्रीशक्तीचे दर्शन घडविणारी संघर्षशील भूमिका हे आजच्या वर्तमान स्त्रीचे कर्तव्य आहे. परंतु त्याचसोबत स्त्रीस्वातंत्र्याच्या नावाखाली स्वैरपणे वावरून स्त्रीत्वाला कोठेही गालबोट लागणार नाही, याची काळजी घेऊन आपल्यातील उपजत असलेले सामर्थ्य समाजजीवनाला, राष्ट्रजीवनाला सहाय्यभूत ठरेल याची काळजी घ्यावी. शेवटी स्त्रियांनी परिपूर्ण नागरिक म्हणून सर्व लोकशाही प्रक्रियांमध्ये सहभागी होण्याची समान संधी त्यांना मिळालीच पाहिजे हे जोपर्यंत जनमानसावर प्रभावीपणे बिंबवले जात नाही आणि समाजमन जोपर्यंत हे स्वीकारीत नाही, तोपर्यंत कोणतीही क्रांती झाली तरी त्याला अर्थ नाही. वंदनीय महाराजांना अपेक्षित असणारा आदर्श स्त्रीचा दर्जा समाजमनाकडून मिळण्याचे प्रयत्न होतील, अशी आशा करू या!

•

## वाचक प्रतिक्रिया

'गदर : एक क्रांतीकारी शाहीर'हा योगेश कुदळे लिखीत फेब्रुवारीच्या अंकातील लेख वाचनीय झाला आहे. इंजिनियर होण्याचं स्वप्न घेऊन एक तरुण पुढे नक्षलवादी चळवळीत जातो व पुढे नक्षलवाद सोडून गाण्याच्या माध्यमातून ठिक-ठिकाणी फिरुन संविधान व लोकशाही संवर्धनासाठी लोकशाहीर म्हणून आपली स्वत:ची ओळख निर्माण करतो. सदर लेखामधून त्याच्यात दडलेल्या क्रांतीकारकाचे दर्शन झाले. पाठीच्या मणक्यात बंदुकीची गोळी कायम अडकली असून सुद्धा जिद्दीने वाटचाल करीत संविधान वाचविण्याची त्यांची तळमळ अंतर्मुख करायला लावणारी आहे. धार्मिक कट्टरतावाद, अराजकता, जनतेची दिशाभूल, खाजगीकरण, बेरोजगारी अशा कितीतरी समस्या आज देशात आहेत. अशा पार्श्वभूमीवर त्यांचे कार्य खरोखरच प्रेरणादायी होते. या लेखाच्या निमित्ताने एका क्रांतीकारकाचा प्रवास समजला व आवडला. लेखकाचे मनापासून कौतुक.

– **पुरुषोत्तम ठाकरे**, गडचिरोली

'संगठन गढे चलो' हा फेब्रुवारी महिन्याच्या अंकात प्रसिद्ध झालेला लेख आवडला. विनायक सावळे यांनी संघटना प्रभावी, प्रवाही, वर्धिष्णू, निकोप, एकसंघ कशी राहील व संघटनेत अत्यंत महत्वाच्या आठ प्रमुख गोष्टी किंवा वैशिष्ट्ये याबाबत अभ्यासपूर्ण लेख लिहिला आहे. कुठलीही संघटना चालवण्यासाठीची आवश्यक मुद्दे आपण सविस्तर मांडले. आमच्या लासुर स्टेशन येथील भास्कर बनसोडे यांनी अगदी याच पद्धतीने शाखा चालवून सध्या ते जिल्हा कार्याध्यक्ष आहेत. दोघांचेही हार्दिक अभिनंदन.

– **डॉ. विकास संगेकर**, लासुर स्टेशन

स्मशानभूमीतील वाढदिवस हा अभय कुंभार लिखित फेब्रुवारीच्या अंकात प्रकाशित झालेला लेख अतिशय उत्कृष्ट आहे. स्मशानामध्ये वाढदिवस साजरा करून तुम्ही स्मशानाचे पावित्र्य वाढवले आहे. स्मशानभुमी संदर्भात लोकांच्यात असणारे गैरसमज यामुळे दूर होणार आहेत. आज मोजक्याच लोकांनी या गोष्टिला पाठिंबा दिला असला तरी हे विचार नक्कीच भविष्यामध्ये सर्वांना पटतील याची मला शंभर टक्के खात्री आहे. आपण अंनिसचे काम करता याबद्दल सुद्धा आम्हांला आपला आदर आहे.

– **प्रदिप गायकवाड**, फुपिरे

प्रिय सुरज, गणित प्रेमी हे सदर चालवून आपण छान काम करीत आहात. मी नियमित हे सदर वाचतो. कोडीही सोडवतो. आपण उत्तरोत्तर अशीच प्रगती करावी ही सदिच्छा. या वेळच्या कोड्याचे उत्तर पाठवले पाहिजे असे मला वाटले म्हणून मी ते पाठवीत आहे.

– **किशोर वानखडे**, वर्धा

# विद्यार्थी आणि पालकांमधील अंधश्रद्धा



**संजय देशपांडे** । मुंबई
९९२०४१५९७९

यशप्राप्तीसाठी योग्य दिशेने प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक असते. परंतु गेल्या साडेतीन दशकांहून अधिक काळ केलेल्या निरीक्षणातून आढळून येते की, आपल्या समाजामध्ये प्रयत्न आणि कष्ट याखेरीज नवस बोलणे, कौल लावणे, गाऱ्हाणे  घालणे यांसारखे इतर अनेक प्रकार केले जातात आणि ऐकण्यात येतात. हा लेख लिहीत असताना, दहावी-बारावीच्या परीक्षा सुरू असल्यामुळे विद्यार्थी आणि पालक यांमध्ये त्यांच्या अभ्यासरूपी प्रयत्नांबरोबर पालकांचे श्रद्धेच्या नावाखाली चालत असलेले अंधश्रद्धेचे असंख्य प्रकार पाहावयास मिळतात.

यातील काही अंधश्रद्धा वरवर पाहाता निरुपद्रवी वाटत असल्या तरी त्या विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर दूरगामी परिणाम करणाऱ्या असतात. पेपरला जाताना विशिष्ट रंगाचा रुमाल बाळगणे, प्रथम डाव्या पायात बूट घालणे, कंपासपेटीत तुळशीचे पान ठेवणे, बॅगेत विशिष्ट महाराजांचा फोटो ठेवणे, घराबाहेर पडताना उजवा पाय प्रथम बाहेर टाकणे, गळ्यात ताईत किंवा मनगटाला विशिष्ट गंडा-दोरा बांधणे, अंगारा किंवा गंध लावल्याखेरीज बाहेर न पडणे, दही-साखर खाऊन परीक्षेस जाणे, विद्यार्थ्यांच्या यशासाठी पालकांनी व्रतवैकल्य करणे, विद्यार्थ्यांनी अंगाऱ्याची पुडी जवळ बाळगणे, दुचाकी किंवा चारचाकी वाहनास लावलेली लिंबू-मिरची बदलणे, जवळच्या मंदिरात प्रसाद चढविणे, कुलस्वामिनीस नवस बोलणे, ग्रहशांती करणे, वक्री ग्रहासाठी अनुष्ठान करणे, एखादा जपमंत्र वहीमध्ये हजारो वेळा लिहिणे, शिकवणी घेणाऱ्या शिक्षकाने प्रवेश मुहूर्त ठरविणे, मुलाचा पेपर सुरू झाल्यापासून ते संपेपर्यंत एखाद्या मंदिरात जप करणे, प्रसाद खाल्ल्याशिवाय परीक्षेला न जाणे, परीक्षा कालावधीत विविध मंदिरात अभिषेक करणे यांसारखे अनेक प्रकार होत असल्याचे आढळून येते. परीक्षेच्या काळात त्याचप्रमाणे जवळजवळ वर्षभर मुलांना त्यांच्या मोबाईलच्या वॉलपेपरवर कोणत्या तरी देवाचे, महाराजांचे, साधूचे चित्र ठेवण्याची सक्ती केली जाते. पालक स्वतःही आपल्या मोबाईलमध्ये तशी तरतूद करतात. परीक्षेमध्ये यश मिळण्यासाठी काही वेळेस मुलांना बोटांमध्ये विशिष्ट रंगाच्या खड्याची अंगठी वापरण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. त्यासाठी काही धार्मिक विधी करून संबंधित अंगठी मिळवली जाते. हे सगळे किंवा यापैकी काही तरी करून विद्यार्थ्यांचे गुण वाढणार असतील तर वर्षभर अभ्यासाचा काहीच उपयोग नाही का?

परीक्षेचा पेपर सोपा किंवा कठीण असा कधीच नसतो! ज्याची तयारी पूर्ण आहे, सर्व किंवा जास्तीत जास्त प्रश्नांची उत्तरे ज्याला येतात तो विद्यार्थी पेपर सोपा आहे असे सांगेल. परंतु सर्व प्रश्नांची किंवा बऱ्याच प्रश्नांची उत्तरे येत नसलेला विद्यार्थी पेपर कठीण आहे असे म्हणतो. 'मी तयारीत कमी पडलो' असे तो म्हणत नाही. अशा वेळी पालकदेखील 'त्याची ग्रहदशा चांगली नाही', 'कोणीतरी करणी केली', 'आपलं नशीबच फुटकं' असे रडगाणे सुरू करतात. कोणताही बोर्ड पेपर किंवा शाळेचा पेपर हा सर्वसामान्य विद्यार्थी उत्तीर्ण व्हावा असा काढला जातो. परंतु पैकीच्यापैकी गुण मिळवायचे असतील त्या विद्यार्थ्याला विशेष प्रयत्न, परिश्रम करावे लागतात.

देवदर्शनासारख्या श्रद्धेचे किंवा अन्य रूढी, परंपरा यांचे रूपांतर अंधश्रद्धेत कसे होते हे पाहणे देखील उद्‌बोधक ठरेल. काही पालक मुलांना शाळा क्लास बुडवून देवदर्शनाला नेतात. गावदेवीचे दर्शन घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगतात. त्यात वेळ गेल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरहजेरी त्यांना अभ्यासात मागे पाडण्यात भर घालते. परिणामी, देवदर्शन करूनही अपेक्षित यश न मिळाल्याने आपल्या अशा कृत्यांची चिकित्सा न करता नशिबाला दोष देणारे पालक आपण पाहातो.

नातेवाईकांकडे होणारे विविध सोहळे, समारंभ, धार्मिक कार्यक्रम यांना उपस्थिती दाखवणे पालकांना मुलांच्या अभ्यासापेक्षा कधी कधी जास्त महत्त्वाचे

वाटते; परंतु अशा सोहळ्यांना उपस्थित राहाणारे विद्यार्थी अभ्यासक्रमांमध्ये, तयारीमध्ये आवश्यक ती गती राखू शकत नाहीत. अशा वेळेस नातेवाईकांची दृष्ट लागली, नजर लागली यांसारख्या पळवाटा शोधल्या जातात. काही वेळेस पालक विद्यार्थ्यांना घेऊन, शाळा-क्लास बुडवून सत्संगाला नेतात. त्या ठिकाणी नेताना मुलांच्या अभ्यासाची त्यांना काळजी असल्याचे दिसून येत नाही. परीक्षेच्या कालावधीत अभ्यासात वेळ व्यतीत करण्याऐवजी पालकांकडून मुलांना देवळात प्रदक्षिणा घालण्यास सांगितले जाते. तेल-माल वाटणे, लांबच लांब रांगा लावून दर्शन घेणे यांसारखे प्रकार घडताना आपण पाहातो. गणेशोत्सव, नवरात्र यांसारख्या सार्वजनिक समारंभामध्ये हिरिरीने भाग घेणारे कॉलेजचे विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून दहा-पंधरा दिवस रात्रंदिवस मेहनत घेतात. अशा वेळेस अभ्यास बुडवून त्यांना देवांचा आशीर्वाद परीक्षेत यश मिळवून देईल असे वाटते. यात समारंभाच्या मिरवणुकीत सहभागी झालेच पाहिजे; तरच देव पावेल अशी त्यांची धारणा दिसते. दहावी बारावीच्या वर्षात नवरात्र उत्सवाच्यावेळी काही विद्यार्थी नऊ दिवस अनवाणी प्रवास करतात. त्याबद्दल विचारता 'मन्नत मागितल्याचे' कारण सांगितले जाते. त्याचप्रमाणे दिवसभर उपाशी राहून रोजे पाळले जातात. भुकेपोटी विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर होणारा परिणाम, सोहळे-उत्सव-पूजाविधी वगैरेत वाया गेलेला महत्त्वपूर्ण वेळ, झोपेवर पडणारा ताण या सगळ्यांचा विचार केला जात नाही. पालकांचाही या गोष्टीला विरोध नसतो. अशा धार्मिक सोहळ्यांमुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान पालक उघड्या डोळ्यांनी पाहातात आणि नशिबाला दोष देत सहनही करतात.

वरील अंधश्रद्धांव्यतिरिक्त अन्य काही अंधश्रद्ध बाबी, गैरसमजुती अशा असतात की, त्या वेगळ्या प्रकारे विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर परिणाम करतात. काही वेळेस मुलांच्या पत्रिकेत 'पाण्यापासून भीती' असा उल्लेख असल्याने, त्यांना शाळेच्या सहलीला पाठविले जात नाही. पाण्यापासून भीती म्हणून त्या क्षेत्रात करिअर न करू देणारे पालकदेखील आपल्याला दिसून येतात. करिअर निवडताना 'कर्ण पिशाच्च', कौल लावणे यांसारखे प्रकार घडून येत असल्याचे दिसते. परदेशगमनाची संधीदेखील कुंडली-पत्रिकेमध्ये शोधली जाते आणि त्यानुसार निर्णय घेतला जातो. विशिष्ट रंगाची वस्त्रे परिधान करावी असा आग्रह असतो. कॉलेज विद्यार्थ्यांमध्ये 'लकी रंग' ही संकल्पना कोणी रुजवली हे शोधण्याची गरज निर्माण झाली आहे. आमच्या देवाला विशिष्ट रंगाचे कपडे घालूनच मंदिर प्रवेश असल्याने, त्यासाठी तत्सम कपड्यांची खरेदी करण्यात वेळ आणि पैसा घालविला जातो.

पत्रिकेत 'प्रेमविवाह करेल' असा उल्लेख आढळून आल्याने मुलाच्या किंवा मुलीच्या प्रत्येक हालचालीवर डोळ्यात तेल घालून नजर ठेवणे, पाठलाग करणे, प्रसंगी खाजगी डिटेक्टिव्हची मदत घेणे, अशा प्रकारांमुळे पालक व विद्यार्थी यांच्यातील विश्वासाच्या नात्याला निश्चितच तडा जातो. नाती दुरावतात. पाल्याला पालक खलनायक वाटू लागतात. अंधश्रद्धेच्या मानसिकतेतून घडणारा आणखी एक प्रकार काही वेळेस आढळतो. तो म्हणजे मुलींना पोहणे, सायकल चालविणे, बाईक चालविणे यास मनाई केली जाते. त्यामध्ये कोठेतरी त्यांच्या कौमार्यतेबद्दल भीती निर्माण केली जाते. याबाबतीत समजाऐवजी गैरसमज जास्त वेगाने पसरतात. या गोष्टींना नको एवढे महत्त्व दिले जाते. परिणामी, मुली खऱ्या अर्थाने काही खेळांपासून वंचित राहातात.

अलीकडे आधुनिक पिढीचा कल 'Easy Money' या संकल्पनेकडे झुकताना दिसतो. अशा प्रकारे सहजपणे मिळणारा पैसा बरेचदा गैरमार्ग अनुसरल्यामुळे मिळतो. त्याचे परिणाम भयावह असू शकतात. हे जेव्हा लक्षात येते तेव्हा बराच उशीर झालेला असतो. वरील प्रकारांमध्ये अडकून पडण्याऐवजी आपल्या पाल्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी काही मोजकेच परंतु सातत्यपूर्ण प्रयत्न पालकांनी करणे आवश्यक आहे. शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि शैक्षणिक विकासासाठी उपयोगी पडणारे विचार पालकांनी आपल्या वर्तणुकीतून पाल्याच्या गळी उतरविण्याची गरज आहे. विद्यार्थ्याला मोबाईल कमी वापर सांगताना प्रथम आपण स्वतः त्याचा वापर मर्यादित ठेवावा. रोज पंधरा मिनिटे केलेला व्यायाम आयुष्याच्या शेवटच्या पंधरा वर्षांसाठी उपयोगी पडतो. यासाठी, आपल्या मुलांनी व्यायाम करावा असे वाटत असल्यास पालकांनी स्वतः त्याचा अंगीकार करावयास

हवा. मुलांच्या आवडीनिवडी ओळखून त्यातून करिअर निवडताना, त्यांना त्यांच्या आवडीशी निगडित असणारी जेवढी करिअर ऑप्शन्स (पर्याय) आहेत त्यांचा पालकांनी अभ्यास करावा. याबाबत मुलांशी सकारात्मक चर्चा करावी. मुलांनी अभ्यासाबाबत पालकांना शंका विचारण्यास संकोच वाटून घेऊ नये, असे संबंध मुलांबरोबर प्रस्थापित करणे आवश्यक आहे. एकदम विरोध करण्याऐवजी प्रथम मुलांचे बोलणे संपूर्णपणे ऐकून घ्यावे.

अशा प्रकारच्या अंधश्रद्धा, अंधश्रद्धेकडे नकळत झुकणाऱ्या श्रद्धा-प्रथा-परंपरा आणि गैरसमज याकडे सर्व पालकांनी डोळसपणे पाहिले पाहिजे. काही छोट्या छोट्या निरुपद्रवी गोष्टी केल्याने फायदा होत नसला तरी नुकसान तर होत नाही ना, श्रद्धा असणे वाईट असते का, असे प्रश्न उपस्थित केले जाऊ शकतात. परंतु हे लक्षात घेतले पाहिजे की, अशा प्रकारांमुळे मुलांची यशासाठी योग्य दिशेने प्रयत्न करण्याची, वास्तवाकडे चिकित्सकपणे, वस्तुनिष्ठपणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहण्याची वृत्ती दडपली जाते. मुले दैववादी बनतात. आपल्या अपयशाचे विश्लेषण करून, त्याचे वास्तव कारण शोधून, त्यातून काही बोध घेण्याऐवजी ते कर्मकांडात झालेल्या चुकांवर खापर फोडू शकतात. एवढेच नव्हे, तर यातील अनेक प्रकारांमध्ये मुलांचा अमूल्य वेळ, त्यांची ऊर्जा अक्षरशः वाया जाते, जिचा उपयोग त्यांचे ज्ञान आणि परीक्षेतील गुण वाढवण्यासाठी केला जाऊ शकतो. मग, प्रश्न असा पडतो की मुलांच्या भल्यासाठी काय केले पाहिजे? मुलांची अभ्यासातील असो किंवा अन्य प्रगती असो, त्यासाठी पालकांनी या सर्व अंधश्रद्धांना दूर सारून आणि श्रद्धांकडे डोळसपणे पाहून पुढील गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

परीक्षा आणि यश यांची योग्य सांगड घालावयाची असल्यास योग्य सराव, नियमित मूल्यमापन, आवश्यक मार्गदर्शन, समर्पक समुपदेशन आणि सुचविलेल्या सुधारणांची अंमलबजावणी ही पंचसूत्री अत्यंत परिणामकारक ठरते.

विद्यार्थ्यांनी उत्तम मानसिक आणि बौद्धिक प्रगतीसाठी वाचनाची आवड जोपासावी यासाठी पालकांनी स्वतः वाचन करावे. किंबहुना काही पुस्तकांचे वाचन घरात सर्वांसमोर घडवून आणावे. वाचनासाठी विविध वयातील विद्यार्थ्यांनी कोणती पुस्तके निवडावीत यासाठी आपल्याला त्यांच्यासमोर पर्याय उपलब्ध करून देता आले पाहिजेत. आपल्या पाल्याची 'स्तुती' सर्वांसमोर करावी, तर त्रुटींबद्दल व्यक्तिगत समज द्यावी. परंतु नेमके उलट चित्र दिसून येते. परिणामी, कुटुंबाचे मानसिक संतुलन ढळत गेल्याचे दिसून येते. सध्या विद्यार्थ्यांच्या खाण्याच्या आवडीनिवडीचे फारच कोडकौतुक होते; परंतु त्यातून बाहेरचे खाण्याकडे कल वाढतो. घरात आईच्या वात्सल्याने तिच्या हातून काळजीपूर्वक बनविलेला डबा याला खूप महत्त्व आहे. परंतु घरी स्वयंपाक करण्याऐवजी बाहेरून मागवून खाणे, बाहेर खाणे, जंक फूड यासारखी संस्कृती पसरत चालल्याचे दिसते. या सर्वांचे होणारे दुष्परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रकृती-स्वास्थ्याची स्थिती नाजूक करतात. परिणामी, लहान वयातच विशिष्ट व्याधींनी मुले त्रस्त होतात. सर्व प्रकारची पोषणतत्त्वे आवश्यक त्या प्रमाणात शरीराला मिळावीत यासाठी पालकांनी खाण्याबाबतच्या स्वतःच्या सवयी तपासून घ्याव्यात. ज्या भाज्या मुलांकडून खाल्ल्या जात नाहीत, त्यातून मिळणाऱ्या पोषणतत्त्वांपासून ते वंचित राहातात. परिणामी, कुपोषणाचे बळी ठरतात. 'गिळलं की सर्व पचतं, चोचले फक्त जिभेचे असतात.'

सोशल मीडिया, इंटरनेट यामुळे जगातील बऱ्याच गोष्टी फिंगरटिप्सवर उपलब्ध झाल्या आहेत. मुले त्यात काय बघतात, याचा आढावा पालकांनी घेणे गरजेचे आहे. काही वेळेस अशा गोष्टी पालकांच्या मोबाईलमध्ये असल्याने मुलांना प्राप्त होऊ शकतात. यामार्फत ज्ञानवृद्धी होण्याऐवजी काही वेळेस चुकीची माहिती मनात घर करू शकते.

'स्वच्छता' हा आणखी एक संस्कार मुलांवर होण्याची गरज अगदी सुरुवातीच्या वयापासून होणे अत्यंत आवश्यक आहे. विशिष्ट वारी केस, नखे न कापणे, ठरावीक दिवशीच डोक्यावरून स्नान करणे, अमावास्येला नखे न कापणे, केस न कापणे अशा प्रकारच्या अस्वच्छ अंधश्रद्धा विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात घालतात. स्वच्छतेच्या काही सवयी पालकांच्या कृतीतून मुलांमध्ये उतरत असतात. मुलांची पौगंडावस्था

हा देखील एक महत्त्वाचा घटक शैक्षणिक प्रगतीवर परिणाम करू शकतो. वाढत्या वयामुळे शरीरात घडणारे बदल सकारात्मक पद्धतीने स्वीकारून योग्य प्रकारे समजून घेतले पाहिजेत. या शारीरिक आणि मानसिक बदलांचे शास्त्रीय ज्ञान त्यांना मिळेल याची सोय केली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या शरीराबद्दलचे विज्ञान त्यांना समजले तर बऱ्याच गैरसमजुती दूर होण्यास मदत होईल. वैयक्तिक आरोग्य राखण्याच्या चांगल्या सवयी अंगीकारल्या जातील. मासिक धर्माबद्दल अजूनही समाजात असलेली मानसिकता ही अंधश्रद्धेतूनच आली असल्याचे आढळते. आईची वैज्ञानिक दृष्टी मुलीवर चांगला परिणाम करू शकते आणि याबाबतीत आवश्यक असणारे संस्कार मुलीला मिळू शकतात. परिणामी, वैज्ञानिक दृष्टिकोन असणारी माता तिचे विचार पुढच्या पिढीपर्यंत आणि कदाचित त्यापुढच्या पिढ्यांपर्यंत सहज पोहोचवू शकते.

या वयात मैत्री ही संकल्पना अंकुरते आणि आकार घेते. योग्य मित्र-मैत्रीण व्यक्तिमत्त्वावर निश्चितच परिणाम करतात. पालकांनी मुलांच्या मित्रांचादेखील परिचय करून घेतला पाहिजे. त्यासाठी मुलांच्या वाढदिवसासारखे सोहळे घरीच साजरे करावेत. असे सोहळे बाहेर सार्वजनिक स्थळी साजरे होऊ नयेत. त्यावरून त्यांची मैत्री कोणाशी आहे, त्यांची शैक्षणिक प्रगती काय आहे, याचा अंदाज घेता येतो.


उत्तम दर्जाचे अन्न, वैयक्तिक आणि सामाजिक स्वच्छतेच्या सवयी तसेच नियमित माफक व्यायाम हे मुलांचे शारीरिक आरोग्य निश्चितपणे चांगले राखू शकतात. एखाद्या मैदानी खेळाची सवय देखील आवश्यक ठरते. खेळ हे जीवनासाठी अत्यंत आवश्यक आहेत. पराभव झेलण्याची तसेच तो पचवण्याची क्षमता खेळांमुळे रुजते. प्रसंगी करिअर निवडताना किंवा त्याच्या मार्गात येणारे अडथळे किंवा पराभवाचे प्रसंग सकारात्मक पद्धतीने स्वीकारून पुढे जाण्याची असामान्य क्षमता खेळांमुळे विकसित होते. पालक स्वतः खेळत नसले तरी खेळांना प्रोत्साहन दिल्यास पाल्याच्या शैक्षणिक विकासामध्ये चांगली गती प्राप्त होते. एखादा चांगला छंद जोपासणे हे देखील व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने चांगले लक्षण आहे. 'छंद' फावल्या वेळेचा सदुपयोग करणारे उत्तम साधन आहे. 'जतन' करण्याची वृत्ती यापासून विकसित होते. 'दुसऱ्यांच्या छंदांचा आदर करणे', हा देखील छंद असण्याचा फायदा आहे.

श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामधील धूसर रेषा, Thin line, पालकांनी मुलांना त्यांच्या कृतीतून दाखवून द्यावी. विज्ञानाची कास धरली की सर्व शंकांचे समाधान होण्यास, पर्यायाने सुजाण नागरिक होण्याच्या दृष्टीने योग्य पाऊल पडेल असे म्हणता येईल. या सर्व प्रयत्नांतून आदर्श, विज्ञाननिष्ठ, सुसंस्कृत नागरिक घडावा ही सदिच्छा!

**(लेखक माजी प्राचार्य आहेत.)**

●

## अभिनंदन



महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य सरचिटणीस सचिन थिटे याची रिझर्व बँक ऑफ इंडिया मध्ये वर्ग एक अधिकारी पदी पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

**अभिवादन**



महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे यांची आई द्रौपदी बाबुराव बनसोडे (वय ९६ वर्षे) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांना महा.अंनिसच्या वतीने भावपूर्ण आदरांजली



# क्रीडा जगतातील अंधश्रद्धा

**सुशीला मुंडे ।** नवी मुंबई
९५७३६७३७०२

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे असे वारंवार म्हटले जाते. मात्र ही विविधता कुठे, केव्हा आणि कशी प्रदर्शित होईल, याचा काही नेम नाही. भारत अंधश्रद्धेच्या क्षेत्रातदेखील या विविधतेने एका विचित्र दिशेकडे वाटचाल करीत त्यातही अजब रेकॉर्ड करण्याचा प्रयत्न करतो आहे की काय अशी खबर जगाला नुकतीच लागली आहे. जगभर क्रिकेट, टेनिस, बॉक्सिंग, बॅडमिंटन वगैरे विविध खेळ खेळले जातात. परंतु फुटबॉल या खेळाची झिंग काही वेगळीच! खेळ कुठलाही असो आणि विशेषतः तो सांघिकरीत्या खेळायचा असेल तर निवड होणाऱ्या खेळाडूंच्या पात्रतेचे अनेक पैलू लक्षात घेतले जातात. एखाद्या खेळाडूचा अनुभव, फिटनेस, सातत्य, मागील काही वर्षांतील त्याचे नैपुण्य, मानसिक स्थिती, सांघिक भावना, इतर खेळाडूंशी वर्तन, सरावातील नियमित हजेरी, निर्णयक्षमता, शिस्त, स्पर्धात्मक कौशल्य इत्यादी गुणांचे दीर्घकाळ निरीक्षण करीत राहावे लागते. विशेषतः आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळ किंवा सामने खेळायचे असतील तर या गोष्टी कटाक्षाने पाळल्या जातात. मात्र वशिला जितका तगडा असेल त्या प्रमाणात निवड होताना एक वा या सगळ्या अटी कमीअधिक प्रमाणात शिथिल केल्या जातात.

हे सगळं आठवण्याचं कारण नुकतीच 'द इंडियन एक्सप्रेस' या वृत्तपत्रात एक बातमी छापून आली. ती अशी होती, 'भारतीय फुटबॉल संघ सगळ्या सामन्यांमध्ये एकही गोल न करता पराभूत होऊन परतला.' कारण खेळाडूंची निवड त्यांच्या कामगिरीच्या निकषांवर न करता ज्योतिष्याच्या सल्ल्यानुसार केली गेली होती! विशेष म्हणजे ज्याला फुटबॉलमधील ओ की ठो काहीही कळत नाही अशा ज्योतिष्याच्या या सल्ल्यासाठी १२ लाख रुपये मानधन देण्यात आले. हे वाचताना मला फुटबॉलचा सामना कोण जिंकेल याविषयी मागे एकदा पॉल नावाच्या एका ऑक्टोपस या समुद्री प्राण्याने भाकीत केल्याचे प्रकरण आठवले. मग आताच्या फुटबॉल सामन्यांमध्येही कोण हरणार, हे सांगायला तसाच एक पॉल पुरेसा होता की. बारा ते पंधरा लाख रुपये मानधन घेणाऱ्या ज्योतिष्याची गरजच काय होती? सन २०१० मधला फिफा विश्वचषक जरा आठवून पाहा. खेळाडूंपेक्षाही ऑक्टोपस ओरॅकल पॉल हाच जास्त भाव खाऊन गेला होता. स्पेन वर्ल्ड चॅम्पियन झाला; जर्मन ओरॅकलचे सर्व ७ अंदाज खरे ठरले. ऑक्टोपस ओरॅकल पॉलने भाकीत केले होते की, स्पेन हॉलंडला हरवून फिफा विश्वचषक २०१० जिंकेल. पॉलचे अंदाज संपूर्ण युरोपमधील टी.व्ही. वाहिन्यांवर थेट प्रसारित झाले. बातम्यांमध्ये देखील ओरॅकल पॉलला विशेष स्थान होते; वर्तमानपत्रांमध्ये रकाने भरून येत होते. अंधश्रद्धांच्या क्षेत्रामध्ये गरीब-श्रीमंत, ज्येष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच, प्रगत-अप्रगत, शिक्षित-अशिक्षित असा भेदभाव दिसून येत नाही. फार तर स्वरूप वेगवेगळे असू शकते. भारताच्या तुलनेत स्पेन हे प्रगत राष्ट्र. परंतु अचूक अंदाज वर्तवण्याचा पॉलचा फंडा संपूर्ण विश्वाने मानला. मुळात फुटबॉल या खेळाला जगभर मान्यता आणि लोकप्रियता. त्यात ऑक्टोपसचे एका मागोमाग एक अचूक भाकिते. मात्र मुळाशी जाऊन चिकित्सा, परीक्षण, निरीक्षण करण्याचे कष्ट घ्यायला कुणीही तयार नव्हते. सध्या पॉल काय करतोय? अचूक भाकीत करण्याची त्याची क्षमता लयास गेली की काय? अशा काही शंका येऊ लागतात.

बऱ्याचशा खेळाडूंचे काही ना काही 'लकी चार्म्स' असतात. अगदी जगभरच्या खेळाडूंचाही यात समावेश आहे. कुणी मैदानात उतरण्यापूर्वी विशिष्ट वॉशरूम वापरतात तर कुणी विशिष्ट रंगाचे अंडरवेअर्स. काही खेळाडू शतक जवळ आले की, वारंवार आकाशाकडे बघून गळ्यातील जी प्रतीकं असतात त्यांचं चुंबन घेतात. अशा कृत्यांचा मैदानातील त्यांच्या कामगिरीवर प्रभाव पडण्याशी कोणता संबंध असतो? त्यांच्या या कृत्यांचा यशापयशाशी संबंध दर्शवणारे असे कुठलेही निरीक्षण नाही. कुठेतरी, केव्हातरी कावळा बसायची आणि फांदी

तुटायची वेळ एक झालेली असते आणि तेच प्रमाण मानलं जातं.

भारताबद्दल बोलायचे तर चंद्रावर व मंगळावर यान उतरवणारा, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात तज्ज्ञांची निर्यात करणारा, अशी आव्हानात्मक कामगिरी करणारा देश आहे. पण यश, अपयश, सफलता यांची नशीब, ज्योतिष, प्रारब्ध यांच्याशी सांगड घातली जाते आणि १२ ते १५ लाख रुपये मानधन देऊन फुटबॉल खेळाडूंचे भविष्य सांगणाऱ्या दिल्ली येथील भूपेश शर्मा नावाच्या ज्योतिष्याला आवतन दिले जाते. भूपेश शर्मा हे नाव ज्योतिष क्षेत्रामध्ये प्रसिद्धीस आले आहे. सिनेक्षेत्रातील तारे-तारका तसेच नामांकित कंपन्यांचे चालक-मालक आपल्या आर्थिक उलाढाली संदर्भात भूपेश शर्माचा आधार घेतात. मुळात 'ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशन'चे जनरल सेक्रेटरी कुशल दास यांनीच प्रशिक्षक इगोर स्टीमॅक व ज्योतिषी भूपेश शर्मा यांची भेट घडवून आणली. त्यामुळे निर्णय एकट्या प्रशिक्षकाचा होता असे मानण्याचे कारण नाही. अर्थात, इथे फुटबॉल संघाचा कुशल प्रशिक्षक इगोर स्टीमॅक हाही हतबल होता. कारण हा निर्णय सर्वस्वीपणे इंडियन फुटबॉल फेडरेशनने घेतलेला असतो. 'आले सेक्रेटरीच्या मना, तिथे कोणाचेही चालेना', अशी गत खेळाडूंकडून कठोर मेहनत करून घेणाऱ्या इगोर स्टीमॅकची झाली.

असे सांगितले जाते की, खेळाडूंची निवड निर्णायक स्थितीला असताना केवळ एकच तास अगोदर त्यांच्या कुंडल्या ज्योतिष्याकडे पाठविल्या गेल्या. परंतु अशा कुंडल्या ज्योतिष्याकडे त्यांना हवा तितका वेळ अभ्यासण्यासाठी आधी दिल्या तरी त्यातून त्यांचे निष्कर्ष अचूक मिळतील काय, हा खरा प्रश्न आहे. अमुक काळात तमुक खेळाडूची कामगिरी बरी-वाईट असेल असे भाकीत वैज्ञानिक कार्यकारणभावाने सांगता येत असेल, तर ते भाकीत न राहता ते अचूक वैज्ञानिक निष्कर्षच ठरतील. तसे शक्य असेल तर सामन्यांचे वेळापत्रक आधीच ठरलेले असते, मग सकारात्मक भाकीत असलेल्या खेळाडूंनाच सरावासाठी निवडणे महत्त्वाचे ठरणार नाही काय? परंतु खेळाडूंचे खेळातील नैपुण्य, सरावातील नियमित मेहनत, शिस्त, निर्णयक्षमता इत्यादी गुण ऐनवेळी दुर्लक्षित करून, त्यांच्या या गुणांचे मूल्यमापन न करता ज्योतिषाच्या दैवीमार्गाने त्यांची निवड करणे हा त्या सर्वच खेळाडूंवर अन्याय ठरणार नाही काय? अशा पद्धतीने निवडलेले खेळाडू अखेर काय दिवे लावणार? जर गुणवत्तेनुसार पट्टीचे खेळाडू निवडले गेले असते, तर अशा दारूण पराभवामुळे भारताची जगभरात नाचक्की झाली नसती. भूपेश शर्माच्या तथाकथित ज्योतिषशास्त्राचे पितळ उघडे पाडण्यासाठी इतक्या लाजिरवाण्या प्रकारे क्रीडासंघाचा पराभव व्हावा लागतो, हे वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणाऱ्या नागरिकांसाठी धक्कादायक आहे.

ज्योतिषानुसार भाकिते सांगणाऱ्यांचा प्रचंड प्रभाव भारतीय जनमानसावर आहे. मात्र तरीही दैववादाचे उघड पुरस्कार करणारे असे प्रकार क्रीडाक्षेत्रात घडत असतील, तर त्यातील प्रशिक्षक वर्गासह खेळाडूंचा आणि एकूणच क्रीडारसिकांचा देखील तो अवमान ठरतो. जनतेने कररूपी दिलेल्या पैशाचा निरर्थक, अविवेकी कामासाठी चुराडा असतो. इथे दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडतात. खेळाडूंवर मेहनत घेणाऱ्या प्रशिक्षकाच्या मानधनाचा प्रश्न तसा गैरलागू आहे; परंतु अन्यायकारक, तथ्यहीन, तर्कविसंगत निवडप्रक्रिया लादणाऱ्या ज्योतिषालाही १२ ते १५ लाख रुपये एवढे प्रचंड मानधन देणे, हे अवघ्या जगात भारतासारख्या देशातच प्रथम घडले आहे. या देशात प्रयत्नवादावर दैववाद नेहमीच वरचढ ठरत आलेला आहे. एखादा क्रीडासंघ जिंकण्यासाठी त्या संघाचा प्रशिक्षक आणि त्या संघाचा कर्णधारच खेळाडूंची निवड उत्तमरीत्या करू शकतो. मात्र आशिया फुटबॉल कपमध्ये हे घडले नाही. विशेष म्हणजे जे घडलं किंवा खेळाडूंवर जो अन्याय झाला त्याबद्दल आजी-माजी फुटबॉलपटूंनी, इतर खेळाडूंनी ब्रदेखील काढलेला नाही. कारण महिला कुस्तीपटूंचे नुकतेच रस्त्यावर जे हाल झाले त्यातून क्रीडाविश्वात एक प्रकारची दहशत पसरलेली दिसून येते.

ज्योतिषाच्याआधारे एखाद्या क्रीडासंघातील खेळाडूंची निवड करायची पद्धत अतिशय हास्यास्पद आहे. अगदी शाळकरी मुलगा जो सारासार विचार करू शकतो त्यालाही ही पद्धत पटणार नाही. भूपेश शर्मा खेळाडूंच्या नावासमोर काहीही शेरे मारायचा. उदाहरणार्थ, चांगले करू शकतो, आक्रमक होऊ शकतो,

अमुकसाठी वाईट दिवस, तमुक प्रतिस्पर्ध्याला भारी पडेल इत्यादी. जर एखाद्या खेळाडूसाठी सामन्याचा दिवस वाईट असेल तर अगदी ऐनवेळी म्हणजे आदल्या दिवशीच त्या खेळाडूला कोणतेही साधार कारण नसताना वगळले जात असे. खेळाडूंनी केलेल्या कठोर परिश्रमांवर, सरावावर क्षणात पाणी फेकले जायचे. एक प्रकारे ही खेळाडूंची क्रूर चेष्टाच होती. जेव्हा केव्हा प्रशिक्षक स्टीमॅक आणि भूपेश सुरुवातीचे ११ खेळाडू, ज्याला स्टार्टिंग इलेव्हन असे म्हणतात अशा खेळाडूंवर वारंवार चर्चा करीत असत तेव्हा सर्वच खेळाडू प्रचंड दडपणाखाली वावरत असत. आकाशातील ज्योती–म्हणजे ग्रह, तारे, नक्षत्र आणि राशी आणि खेळाडूंची मैदानावरील कामगिरी यांचा बादरायण संबंधदेखील नसताना निपुण, कुशल मेहनती खेळाडूंवर सतत टांगती तलवार असायची. खेळाडूंचे करियर नष्ट करण्याचा परवानाच एका अर्थी फुटबॉल फेडरेशनने या भूपेश शर्माला दिला होता. भारतीय क्रीडा विश्वामध्ये फुटबॉलसाठी १९५०–६०च्या दशकात सोनेरी दिवस होते. भारतीय फुटबॉल टीम आशियातील सर्वोत्कृष्ट टीम गणली जात असे. अगदी मागील काही मोसमात देखील फुटबॉलपटूंची कामगिरी उंचावलेली होती. क्रीडा संस्कृती निर्माण करायची असेल तर निपुण खेळाडूंच्या कामगिरीचे योग्य मूल्यमापन होऊन त्यांना प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. अशा प्रकारचे आत्मघातकी सल्ले देणाऱ्या ज्योतिषांना आणि त्यांचा पुरस्कार करणाऱ्यांना जरब बसेल असे अंधश्रद्धा निर्मूलनविषयक कायदे व्हायला हवेत. प्रयत्नवादाला डावलून दैववादाचा राजरोस पुरस्कार करणाऱ्यांनाही वठणीवर आणायला हवे. सत्यात उतरणार नाही अशा भोंदूगिरीसाठी १२ ते १५ लाख रुपये मोबदला दिला गेला, तो सर्व खर्च इंडियन फुटबॉल फेडरेशनकडून वसूल व्हायला हवा. अशा घटना जेव्हा प्रसिद्धीला येतात तेव्हा अस्वस्थ विवेकी जनता महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे धाव घेते आणि त्यांच्यासाठी महा. अंनिस तेव्हा हुकमी एक्का असते. मीडियावाले देखील या प्रश्नांवर बोलण्यासाठी अंनिसच्या कार्यकर्त्यांचा शोध घेतात. कार्यकर्त्यांचे व्यक्तिगत फोन सतत घणघणत असतात. परंतु त्याचवेळी संघाचा प्रशिक्षक दुसऱ्या धर्माचा आहे म्हणून अंनिसने कशी शेपूट घातली, नांगी टाकली, अशा अविर्भावात काही मंडळी टीका करीत असतात. तरीही महाराष्ट्र अंनिसचे कार्यकर्ते हैराण न होता तितक्याच क्षमतेने आलेल्या प्रश्नांना भिडतात, समर्पक उत्तरे देतात, अभ्यासपूर्ण मते मांडून विरोधकांची तोंडे बंद करतात. तेव्हा पुन्हा एकदा 'आम्ही सारे दाभोलकर' या घोषवाक्याची आठवण होते. 'तू चाल पुढं तुला रं गड्या, भीती कशाची, पर्वा बी कुणाची' हा निर्भयतेचा वसा आपल्याला डॉक्टरांकडूनच मिळालेला आहे. मात्र अशा शोषक ठेकेदारांची मक्तेदारी संपवण्याची भाषा ना इथल्या व्यवस्थेकडून होते, ना सत्ताधिशांकडून. तूही खा, मलाही खाऊ दे म्हणजेच 'सबका साथ, सबका विकास'.

ज्योतिष या छद्मविज्ञानाची घुसखोरी इथेच थांबेल का? हा प्रश्न आता उद्भवला आहे. कारण वैद्यकीय क्षेत्रातदेखील ही घुसखोरी होते आहे, असे समजते.

**(लेखिका महा. अंनिसच्या राज्य कार्यकारिणीच्या निमंत्रित सदस्या आहेत.)**

•

## अभिनंदन



महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नागपूर जिल्हयाचे जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांना महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल महा. अंनिसच्या वतीने गौरव आळणे आणि कुटुंबीयांचे हार्दिक अभिनंदन.





# ...आणि मला उत्तरे मिळू लागली

**गणेश शेलार** । कोनगाव (भिवंडी)
७०५७४७८७७६

सध्या माझे वास्तव्य कल्याणजवळील कोनगाव या गावी असले तरी माझे बालपण ठाणे जिल्ह्यातील कुंदे या गावात गेले. मी आणि माझे कुटुंबीय अन्य सर्वसामान्य कुटुंबांप्रमाणेच श्रद्धा, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा पाळणारे होते. कुटुंबीय, मित्र यांनी अगदी तिखट-मीठ लावून सांगितलेल्या विविध भूत-कथांमुळे माझा भुताखेतांवर विश्वास बसलेला होता. त्यांची भीती मनात होती. लहानपणीच्या काही घटना आठवतात. मुळात चौकस वृत्ती असल्याने या घटनांच्या बाबतीत मनात काही प्रश्न येत, परंतु त्यांची उत्तरे मिळत नव्हती. मी शाळेत असताना नदीकाठी एका झोपडीत राहाणाऱ्या मांत्रिकाने मला भीती घालून तीन दिवस उपवास करायला सांगितले होते. परंतु रोजच्या सवयीप्रमाणे सकाळी उठून न्याहारी व्हायची आणि उपवास बारगळायचा. तरीही आपल्याला काही होत नाही लक्षात येत होते आणि ती भीती कमी झाली होती. गावी बसची वाट बघत उभा असताना डोळ्यात कचरा गेल्याने म्हणा किंवा काही भास झाल्याने मला क्षणभर एक मानवी आकृती दिसली होती. ते घरी सांगितल्यावर घरच्यांनी भगताची मदत घेतली आणि बसस्टॉप जवळील लिंबाच्या झाडाखाली मला भुताने झपाटल्याचा निष्कर्ष काढला. मला ती मानवी आकृती क्षणभर दिसली आणि मनावर असलेल्या भुताखेतांच्या प्रभावामुळे मी किंचित घाबरलो होतो. तरीही त्याचा माझ्या तब्येतीवर कसलाही प्रभाव पडला नव्हता, हे माझ्या लक्षात येत होते. त्याच काळात मी चाबूक मारून घेणाऱ्या जरीमरीकडे (यास पोतराज असेही म्हणतात) कुतुहलाने लक्ष दिले होते. हे जरीमरी महिलांना मूल होईल असा आशीर्वाद द्यायचे. परंतु त्यांनी आशीर्वाद दिलेल्या फक्त दोन-तीन महिलांनाच मूल झाल्याचे लक्षात आले होते. या सर्व प्रकाराकडे मी संशयाने पाहू लागलो होतो.

या पार्श्वभूमीवर, मी १७-१८ वर्षांचा होतो आणि माझं महाविद्यालयीन शिक्षण चालू होते तेव्हा माझा अंधश्रद्धा निर्मूलन समितीशी संबंध आला. प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे आणि सुशीला मुंडे यांचं अंनिसमध्ये काम चालू होतं. त्यांच्या संपर्कात आल्यामुळे संघटनेत प्रवेश झाला. डोंबिवलीला त्यांच्याकडे शाखेची मीटिंग व्हायची. १९९१ ते १९९३ अशी तीन वर्ष आम्ही डोंबिवलीला शाखा बैठकीसाठी कल्याण जवळील कोनगावातील तीन-चार कार्यकर्ते जाऊ लागलो. इथे



आल्यावर मला लहानपणी पडलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळू लागली आणि महा. अंनिससोबत घट्ट नाते जुळले. त्यावेळेस चमत्काराच्या प्रयोगाच्या माध्यमातून प्रबोधन करण्यावर जास्त भर होता. लोकांचं मनोरंजनातून प्रबोधन होत असे. कोनगावात मच्छिंद्रनाथ मुंडे सरांनी केलेला जळत्या निखाऱ्यावरून चालण्याचा प्रयोग खूपच प्रभावी झाला होता. आम्ही संघटनेमध्ये आल्यानंतर सुरुवातीला डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या कल्याण, डोंबिवली, ठाणे परिसरात झालेल्या सर्व व्याख्यानांना आवर्जून उपस्थित राहत असल्यामुळे अंनिसची वैचारिक बैठक, अंनिसची चतु:सूत्री (सध्या पंचसूत्री), विवेकीपणा, अंनिसच्या

कार्याचा उद्देश प्रत्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या व्याख्यानातून, त्यांच्या विचारातून समजला. डॉक्टरांचे व्याख्यान म्हणजे विवेकी मेजवानीच असायची. एकदा एकाच दिवशी डॉक्टरांची शहाड, डोंबिवली, ठाणे या ठिकाणी तीन व्याख्याने होती. दोन व्याख्याने मी ऐकली. तिसऱ्या ठाण्याच्या व्याख्यानाला डॉक्टर निघाले होते. मी ट्रेनमध्ये डॉक्टरांच्या शेजारीच बसलो होतो. डॉक्टरांना विचारलं, ''तुमची दोन व्याख्याने ऐकलेली आहेत. तिसऱ्या व्याख्यानात पण तेच बोलणार आहात का?'' त्यांनी सांगितलं, ''ऐंशी टक्के वेगळे भाषण असेल.'' मग मी त्या तिसऱ्या व्याख्यानालाही गेलो. आमच्या कोनगावातही डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या कार्यक्रमाचे महिलांसाठी आणि डॉक्टरांसाठी आयोजन करण्यात आले होते. त्यावेळेस ते प्रथमच आमच्या घरी आले. त्यांनी आमच्या घरी जेवण घेतले. डॉक्टरांचे भिवंडीच्या वाचन मंदिरात दोन कार्यक्रम झाले. दुसरा कार्यक्रम जादूटोणा विरोधी कायद्याच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आला. त्यावेळेस विरोधकांकडून जाणीवपूर्वक या कायद्यासंदर्भात लोकांमध्ये संभ्रम पसरवण्यात आला होता. धार्मिक गोष्टी करता येणार नाहीत, पंढरीच्या वारीला मर्यादा येतील असा संभ्रम निर्माण करण्यात आला होता. या व्याख्यानात कायद्यासंदर्भात, कायद्याच्या वाटचाली संदर्भात, शासन दरबारात अडकलेल्या कायद्याबद्दल डॉक्टरांनी सखोल विवेचन केलं. यावेळेस अनेक पत्रकार उपस्थित होते. त्यांनी वर्तमानपत्रांमध्ये 'जादूटोणाविरोधी कायदा धर्मसत्तेवर आघात करणार नाही', असा मथळा देऊन बातमी दिली होती. अशा प्रकारे मी अंनिसमध्ये खूप काही शिकत होतो.

त्यानंतर मी मागे वळून पाहिले नाही. पनवेलला शांतिवन, नेरे येथे अंनिसचं निवासी शिबिर असायचं. त्या शिबिरात डॉ. दाभोलकरांचे मार्गदर्शन व्हायचे. त्यांचं वर्तन सामान्य कार्यकर्त्यांप्रमाणेच असायचं. कार्यकर्त्यांच्या शेजारी चटईवर झोपायचे. त्यांच्या साध्या राहाणीचे नेहमी अप्रूप वाटायचे. मी ज्या शाळेत शिक्षक आहे त्या आठगाव विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, कोन शाळेत शिक्षकांसाठी एक दिवशीय शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. वाडा, बोईसर या ठिकाणी होणाऱ्या अंनिसच्या शिबिरांसाठी उपस्थित राहण्याची संधी मला मिळाली. यातून विवेकी विचारांसोबत साधेपणा म्हणजे काय हे कळू लागले. माझं पुढचं शिक्षण चालू असल्यामुळे मधल्या काळात काही वर्षे अंनिसमध्ये असलेला सहभाग कमी झाला. नंतर पुन्हा अंनिसमध्ये सक्रिय झालो. २ मार्च, २०११ रोजी भिवंडीत अंनिसची शाखा स्थापन झाली. त्यादिवशी माझी भिवंडी शाखा अध्यक्ष म्हणून निवड झाली. ज्ञानेश्वर गोसावी कार्याध्यक्ष होते. शाखा स्थापन केल्यामुळे जबाबदारीही निर्माण झाली. अंनिसचे विविध उपक्रम भिवंडीमध्ये राबवायला सुरुवात केली. अशा उपक्रमांचा अभ्यास करून माहिती घेऊन, विद्यार्थ्यांचे विविध उपक्रमांद्वारे प्रबोधन करण्यात आले.



७ ऑगस्ट, २०१३ रोजी पुणे येथे पहिले अंधश्रद्धा निर्मूलन साहित्य संमेलन यशस्वीपणे घेण्यात आले होते. अंनिसने सुरू केलेला हा स्तुत्य उपक्रम होता. या साहित्य संमेलनात डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता' या संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा त्यांनी दाखला दिला होता. त्यानंतर काही दिवसांतच म्हणजे २० ऑगस्ट, २०१३ रोजी अतिशय धक्कादायक बातमी कळली. डॉ. नरेंद्र दाभोलकरांची पुण्यामध्ये निर्घृण हत्या झाली. सर्व कार्यकर्ते हादरले. परंतु कार्यकर्ते शांत बसले नाहीत. त्यांनी या घटनेचा निषेध नोंदवायला सुरुवात केली.

आम्ही भिवंडी शाखेच्या कार्यकर्त्यांनी भिवंडीत निषेधाचे फलक लावले. आदरांजली सभा घेण्यात आली. सभेसाठी नागरिक, स्थानिक आमदारही उपस्थित होते. डॉक्टरांच्या हत्येनंतर दहा दिवसांत, १ सप्टेंबरला सातारा येथे घेण्यात आलेल्या अभिवादन सभेस महाराष्ट्रातून असंख्य कार्यकर्ते उपस्थित राहिले. डॉ. दाभोलकरांचे कार्य जोमाने पुढे नेण्याचा संकल्प त्यावेळी सर्वांनी केला आणि चळवळीने आज राज्यभर आपले पाय रोवले आहेत.

पदाधिकारी म्हणून माझी वाटचाल सुरू झाली ती भिवंडी शाखेचा कार्याध्यक्ष म्हणून. या काळात विविध शिबिरे, चमत्कार प्रत्याक्षिकांसह विद्यार्थी आणि जनतेसमोर प्रबोधन कार्यक्रम करणे सुरू झाले. बुवाबाजी, स्त्री–पुरुष समानता, वैज्ञानिक दृष्टीकोन, स्त्री सक्षमीकरण हे विचार मांडण्याची संधी मिळाली. डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या हत्येनंतर महाराष्ट्र सरकारने जादूटोणाविरोधी कायदा पारित केला. या कायद्यासंदर्भात अंनिसच्या कार्यकर्त्यांना कायद्याविषयी जाणीव निर्माण व्हावी म्हणून प्रशिक्षण देण्यात आले. त्या प्रशिक्षणात मी भाग घेतला आणि पुढे प्रशिक्षणाचा उपयोग करून कायद्याविषयी जागृती निर्माण केली. सामाजिक बहिष्कार आणि जादूटोणा संबंधित प्रकरणे हाताळली. महा. अंनिसचे जे जे शक्य होतील ते सर्व उपक्रम राबवले. रिंगणनाट्यात सहभागी झालो. २०१८ ते २०२१ पर्यंत माझी ठाणे जिल्हा प्रधानसचिव म्हणून निवड झाली. या काळात सर्व सहकार्यांच्या मदतीने ही जबाबदारी मी पार पाडली. त्रिदशकपूर्तीनिमित्त मुलुंडच्या कालिदास नाट्यगृहात झालेल्या कार्यक्रमांमध्ये एका मोठ्या कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. या सर्वांतून माझे व्यक्तिमत्त्व घडत होते. यात जिल्ह्यातील कार्यकर्ते, पदाधिकारी, राज्य पदाधिकारी यांची मोलाची साथ मिळत होती.

आपल्या संघटनेत काम करत असताना कुटुंबाचेही पाठबळ आवश्यक असतं. ते मिळालंच. आपल्या अंधश्रद्धा जशा दूर होतात, तशा त्यांच्यामधीलही अंधश्रद्धा दूर होण्यास मदत होते. माझ्या सहचारिणीमध्ये काही परंपरागत अंधश्रद्धा होत्या. त्याही बऱ्याच प्रमाणात दूर झाल्या. विशेष म्हणजे यासाठी मी तिच्यावर दबाव टाकला नाही. माझ्या कामामुळे तिच्यात हळूहळू परिवर्तन होत गेले. माझी मुलं लहानपणापासूनच अंधश्रद्धेपासून दूर राहाण्यास शिकली. मुलांनीही माझ्याबरोबर काही चमत्काराची प्रात्यक्षिके शाळेतील मुलांना करून दाखविली. आपल्या कामाचे प्रतिबिंब कुटुंबीयात उतरून ते पुढच्या पिढीत पोहोचते आहे, ही मनाला अतिशय समाधान देणारी बाब आहे. काही व्यक्तिगत कारणांमुळे आणि नवीन पिढीला संधी देण्याच्या उद्देशाने मी मुख्य पदाच्या जबाबदारीतून मुक्त झालो असलो, तरी जिल्हा प्रशिक्षण कार्यवाह या पदाची जबाबदारी माझ्यावर आहे आणि ती निभावण्याचा मी कसोशीने प्रयत्न करीत आहे. तसेच नोकरी सांभाळून शक्य होतील त्या सर्व उपक्रमांमध्ये सहभागी होऊन हातभार लावण्याचा प्रयत्न करीत आहे.

महा. अंनिसमध्ये केलेल्या कामामुळे मला स्वतःला जे समाधान मिळते ते मी शब्दात सांगू शकत नाही. या कामाची दखल वेळोवेळी विविध वृत्तपत्रांनी घेतली आहे. त्यामुळे सकारात्मक प्रसिद्धी मिळाली आणि समाजात एक वेगळे स्थान निर्माण झाले. जादूटोणा किंवा सामाजिक बहिष्कार प्रकरणांत पोलीस स्टेशनमध्ये गेल्यावर महा. अंनिस कार्यकर्ता म्हणून ते व्यवस्थित लक्ष देतात. यातून महा. अंनिसचे समाजातील, व्यवस्थेतील स्थानदेखील दिसून येते. अंनिसमध्ये आणि शिक्षक म्हणून जे काम केलं त्याची दखल घेऊन, इंडियन वेल्फेअर असोसिएशन, भिवंडी यांनी ३ जानेवारी २०१७ रोजी सावित्रीबाई फुले शिक्षण गौरव पुरस्कार आणि अखिल भारतीय पत्रकार संघाच्या वतीने 'राष्ट्रीय शिक्षक गौरव पुरस्कार' माझा सन्मान केला. यात मोठा वाटा महा. अंनिसचा आहे हे सांगताना मला अभिमान वाटतो. महा. अंनिसने केवळ मला आणि माझ्या कुटुंबीयांनाच विवेकी मार्गावर आणले असे नाही, तर आमच्याकडे पाहून अन्य लोकांचेही कुतूहल जागृत झाले आहे आणि ते आपल्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहात आहेत. अशा प्रकारे विवेकाचा आवाज हळूहळू बुलंद होत आहे, याचे समाधान वाटते.

**(लेखक महा. अंनिसच्या ठाणे जिल्हा प्रशिक्षण विभागाचे कार्यवाह आहेत.)**

●

# युवा संकल्प अभियान

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या जोडीदाराची विवेकी निवड या विभागातर्फे दरवर्षी १२ जानेवारी (राष्ट्रीय युवा दिन) ते १४ फेब्रुवारी (आंतरराष्ट्रीय प्रेम दिवस) दरम्यान राज्यव्यापी युवा संकल्प अभियान राबविले जाते. या अभियानाची समारोप परिषद दि.१७ फेब्रुवारी, २०२४ रोजी एम. डी. कॉलेज, मुंबई येथे संपन्न झाली. ३०० युवकांनी या अभियानात सहभाग घेत जोडीदाराच्या विवेकी निवडीचा संकल्प केला.

**उद्घाटन**

परिषदेचे उद्घाटन सुप्रसिद्ध अभिनेते किरण माने यांच्या हस्ते अभिनव पद्धतीने करण्यात आले. लग्नासंबंधी असणाऱ्या पारंपरिक चुकीच्या विचारांची पाकळी मिटवून कालसुसंगत विवेकी पर्यायांची पाकळी उघडी करत झाले. परिषदेला माधव बावगे (राज्य कार्याध्यक्ष महा. अंनिस), मुंबईचे नायब तहसीलदार मा. प्रभाकर नाईक, नंदकिशोर तळाशीलकर, (राज्य प्रधानसचिव) प्राचार्य सविता शेटे, (विवेक वाहिनी विभाग राज्य कार्यवाह), आरती नाईक (महिला सहभाग विभाग राज्य कार्यवाह) आदी उपस्थित होते. सत्राचे प्रास्ताविक हर्षल जाधव यांनी केले.




अभिनेते किरण माने यांनी या अभियानाचे कौतुक करत तरुण–तरुणींना योग्य वयात योग्य माहिती मिळण्यासाठी विवेकी विचारांची कास धरण्याचा सल्ला दिला. 'अंधश्रद्धा निर्मूलन समिती तुमच्या मदतीस आहे', असं त्यांनी आवर्जून सांगितलं. जातीपलीकडे जाऊन ती व्यक्ती आपल्या विचारांशी, स्वभावाशी जोडणारी, जुळवून घेणारी आहे का, याचा विवेकाने विचार करणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. उदाहरण देत असताना त्यांनी प्राचीन भारतातील चार्वाक आणि आपले क्रांतिसूर्य जोतिराव आणि सावित्रीबाई फुले यांचे उदाहरण दिले. कंपॅनियनशिप किंवा जोडीदार म्हणजे काय याचे उत्तम उदाहरण या जोड्या आहेत असे त्यांनी सांगितले. या दोन्ही जोड्या त्यांच्या त्यांच्या आयुष्यात अनेक आव्हानांना सामोरे जाऊनसुद्धा ते एकमेकांसाठी पूरक ठरल्या.

प्रमुख पाहुणे प्रभाकर नाईक यांनी जोडीदाराची विवेकी निवड विभागाने कोरोना काळात देखील महा. अंनिसच्या जोडीदाराची विवेकी निवड या विभागाने हा उपक्रम चालू ठेवला याबद्दल कौतुक केले. प्रशासकीय सेवेत असूनही महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा कार्यकर्ता म्हणून गेली काही वर्षे काम केल्याने माझ्या विचारांचा दृष्टीकोन बदलला, जीवन जगण्याचा विवेकी मार्ग सापडला, अंनिसच्यासोबत राहाणं म्हणजेच विवेकी मार्गाने जाणं आहे, असेही मत त्यांनी व्यक्त केले. राज्य प्रधानसचिव नंदकिशोर तळाशीलकर यांनी महाराष्ट्र अंनिसची पंचसूत्री, उपक्रम व भूमिका मांडली. एम. डी.



कॉलेजच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. गीता मांजरेकर, एन.एस.एस. प्रोग्राम ऑफिसर प्रा. गाला मॅडम यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. सत्राचे सूत्रसंचालन निशा फडतरे यांनी तर आभार गौरी जाधव हिने मानले.

मा. प्रभाकर नाईक यांची नायब तहसीलदार, मुंबई या ठिकाणी पदोन्नती झाल्याबद्दल व राज्य सरचिटणीस सचिन थिटे यांची रिझर्व्ह बँक ऑफ इंडियामध्ये वर्ग एक अधिकारी पदी पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचे सत्कारपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

**परिसंवाद**

युवा संकल्प अभियानाच्या या समारोप परिषदेत जोडीदाराची विवेकी निवड हा उपक्रम नक्की काय आहे हे सांगणारा हा परिसंवाद होता. परिषदेचा मुख्य गाभा असणाऱ्या या परिसंवादाचे सूत्रसंचालन तुषार शिंदे यांनी केले. परिसंवादात जोडीदाराची विवेकी निवड टीमचे निशा फडतरे, हर्षल जाधव, सचिन थिटे यांनी सहभाग




घेतला. सोबत ऑनलाइन प्रशिक्षणाच्या माध्यमातून नुकतेच विवाहबद्ध झालेली कविता धोत्रे – अमोल कदम ही जोडी देखील सहभागी झाली होती. निशा हिने आजच्या निवड पद्धतीस दिले जाणारे प्राधान्य व प्रत्यक्ष असणाऱ्या अपेक्षा यातील विसंगती मांडली. हे टाळण्यासाठी जोडीदाराची विवेकी पद्धतीने निवड का करायची? त्याची गरज काय? हे स्पष्ट केले. हर्षलने आजच्या प्रचलित 'अरेंज मॅरेज' व 'लव मॅरेज' यांना योग्य असा 'परिचयोत्तर निवडी'चा पर्याय हवा हे स्पष्ट केले. जोडीदाराची विवेकी निवड कशी करायची हे सांगतानाच पारंपरिक कुंडली नाकारून आधुनिक पत्रिका स्वीकारण्याचे आवाहन केले. सचिनने सहजीवनाचा पाया असणाऱ्या लिंग समभावाबद्दल मांडणी केली. या लिंगभाव विषमतेचा सर्वाधिक परिणाम स्त्रियांच्या वाट्याला येतो; तसेच लग्नामुळे जोडीदाराबरोबरच वेगवेगळी नाती दोघांनाही जोडली जातात, या नात्यातील सुरेल संवादासाठी प्रत्येक नात्याला प्रशिक्षणाची गरज कशी आहे, हे सचिनने त्याच्या सत्रातून सांगितले. या सत्रासाठी उपस्थित असणारे कविता व अमोल या जोडीने ते कशा पद्धतीने विवाहबद्ध झाले, दोघांच्याही कुटुंबीयांच्यासोबत झालेला संवाद, कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागले, जोडीदार निवडीचा हा मार्ग कशा पद्धतीने योग्य आहे आणि सध्या त्यांचं सहजीवन कशा पद्धतीने सुरू आहे हे सांगितले. युवा कार्यकर्ता प्रसाद याने आभार व्यक्त केले.

**दिल दोस्ती दुनियादारी**

महिला विभागाची राज्य कार्यवाह  आरती नाईक हिने 'दिल दोस्ती दुनियादारी' या सत्राची मांडणी केली. प्रेम आणि आकर्षण यातील फरक तिने विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केला. चित्रपटातील गाणी, संवाद आणि आपले वास्तव आयुष्य यात होणारी गल्लत समजून सांगितली. डोळसपणाने प्रेम करायला शिकूया, प्रेमामध्ये एकमेकांना मदत करूया. काळानुरूप बदल करत आंतरजातीय– आंतरधर्मीय याच्याही पुढचा विचार करत आंतर मानवीय लग्न ही संकल्पना आपण आता प्रस्थापित करायला हवी. समलिंगी प्रेमाचा आदर करणे, त्यांनाही सन्मान मिळविण्याचा अधिकार आहे, आपण तो मान्य करायलाच हवा. प्रेमाच्या क्षेत्रातल्या सगळ्या घडामोडींबाबत आपण अलर्ट, सजग आणि संवादी राहिलं पाहिजे. कुठल्याही माणसाला प्रेमासाठी त्रास होणार नाही हे पाहणं आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.



प्रेम सर्व रंगांचं असतं, त्याला प्रत्येक रंगाची किनार असते, मात्र प्रेमाचा काळा रंग याबद्दल देखील आपण बोलायला हवं. काळा रंग हा निषेधाचं प्रतीक आहे. प्रेमात मिळालेला नकार न पचवल्याने समोरच्या व्यक्तीचं आयुष्य संपवणे, त्याचा जगण्याचा अधिकार काढून घेणे याने खरंतर प्रेम करणाऱ्या आपल्यासारख्या लोकांच्या देखील भावना दुखायला हव्यात.

एकतर्फी प्रेमाच्या नावाखाली, प्रेमाला नकार दिला म्हणून होणाऱ्या हिंसेचा आपण नेहमीच विरोध केला पाहिजे. जिथे प्रीती असते तेथे भीती नसते. जिथे प्रेम असते तेथे हिंसा नसते, हे आपण पक्कं समजून घेतलं पाहिजे, असेही पुढे आरतीने सांगितले. समाज म्हणून जर आपल्याला समृद्ध आयुष्य जगायचं असेल तर अशा सर्व प्रकारच्या हिंसांना आपण विरोध केलाच पाहिजे. आपण 'प्यारवाली माणसं' आहोत तर समाजामध्ये प्रेम पसरवण्यासाठी एकमेकांच्यासोबत राहूयात, असे प्रतिपादन आरतीने केले. या सत्राचे सूत्रसंचालन रुपेश यांनी, तर आभार अमित कदम याने मानले.

**युवा संकल्प अभियान**

या सत्राची मांडणी राज्य कार्यवाह हर्षल जाधव यांनी केली. अभियानाची भूमिका यावेळी स्पष्ट करण्यात आली. अभियानाअंतर्गत गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये झालेल्या कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला. उपस्थित मुला-मुलींकडून संकल्पपत्रही भरून घेण्यात आले. या संकल्पपत्राचे वाचन परिषदेला आलेल्या विद्यार्थ्यांकडून करून घेतले.



तसेच जोडीदाराची विवेकी निवड ऑनलाइन प्रशिक्षण उपक्रमाबद्दल देखील हर्षलने माहिती सांगितली व लग्नाळू मुला-मुलींना या प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले.

**समारोप**

समारोप सत्राचे सूत्रसंचालन युवा सहभाग विभागाच्या राज्य कार्यवाह प्रियंका खेडेकर यांनी केले. या सत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या ज्येष्ठ साहित्यिका छाया कोरेगावकर यांचा परिचय मानसी हिने करून दिला. छाया कोरेगावकर यांनी आपल्या मनोगतामध्ये अभियानाचं कौतुक करत जोडीदाराची



विवेकी निवड हे अभियान किती महत्त्वाचे आहे आणि आजच्या पिढीसाठी किती गरजेचं आहे हे सांगितलं. उपस्थित प्रेक्षकांमध्ये जास्तीत जास्त प्रेक्षक संख्या ही तरुणांची असल्यामुळे त्यांनी त्याचंही कौतुक केलं आणि आताच्या पिढीमध्ये ऊर्जा आहे, चांगले काम करण्याची इच्छा आहे आणि उद्याची स्वप्ने आहेत हे सर्व पाहून आपणही अगदी ३०-३५ वर्षे मागे गेलो आणि जुन्या आठवणींना उजाळा मिळाला, असं त्यांनी सांगितलं.

जोडीदार निवडत असताना आपण एकमेकांनी काय करायचे आहे किंवा तुम्ही त्यांना किती सहकार्य करायचे, त्यांना स्वातंत्र्य द्यायचे आहे, याचाही विचार करणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितलं. एकमेकांचा आदर करणे, आदराने वागवणे अत्यंत गरजेचे आहे. प्रेम सगळ्यांना

जोडून ठेवणारा दुवा आहे आणि तुम्हीही आपल्या जोडीदारासोबत जोडून घ्या, समजून घ्या, असे सांगून, सर्वांना सदिच्छा दिल्या. दिवसभराच्या या परिषदेबद्दलचा अभिप्राय व्यक्त करण्यासाठी विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून सृष्टी यादव हिने आपले मनोगत व्यक्त केले.

समारोप सत्राचे अध्यक्ष महाराष्ट्र अंनिसचे कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची ओळख करून दिली. 'आपण समाजाचे देणे लागतो आणि ती भावना किमान जागृत करण्याच्या दृष्टिकोनातून ही परिषद महत्त्वाची ठरलेली आहे', असे ते म्हणाले. 'विवेकी समाज निर्माण करण्याच्या कार्यामध्ये आपण सर्व आमच्या संघटनेसोबत या आणि अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे वर्गणीदारदेखील व्हा', असेही आवाहन यावेळी माधव बावगे यांनी केले. या सत्राचे आणि एकूणच



दिवसभराच्या परिषदेचे आभार कोकण विभागाचे राज्य सरचिटणीस विजय परब यांनी मानले. कार्यक्रमाच्या संयोजनात सहभागी असणाऱ्या मुंबईच्या सर्व कार्यकर्त्यांना स्टेजसमोर बोलावून त्यांचे जाहीर आभार व अभिनंदन केले गेले आणि त्यानंतर 'हम होंगे कामयाब' या गीताने समारोप परिषदेची सांगता झाली.

एकूणच या समारोप परिषदेला राज्यभरातील तरुण कार्यकर्त्यांचा असणारा उत्स्फूर्त प्रतिसाद, नियोजनाच्या प्रत्येक लहानसहान गोष्टींमध्ये तरुण कार्यकर्त्यांचा स्वेच्छेने सहभाग, स्टेजवरील गुलाबी रंगांचा झळकणारा बॅनर, सगळेच सर्वांचे लक्ष वेधून घेणारे ठरले.

**परिषदेची काही वैशिष्ट्ये**

**सेल्फी कॉर्नर**

- कार्यक्रमाचा आकर्षण बिंदू ठरलेला सेल्फी कॉर्नर महत्त्वाचा भाग ठरला. वेगवेगळ्या आकारात तयार केलेले पोस्टर्स तरुणांसह ज्येष्ठांनाही आकर्षित करीत होते. 'निवडीचा संकल्प मी केला आणि तुम्ही ?'
- 'आकर्षण आणि प्रेम आहे वेगळे, समजून घेऊ आम्ही सगळे,' 'नात्यातील सुरेल संवादासाठी, जोडीदाराची विवेकी निवड', 'समतेच्या वाटेवरून सहजीवनाचा प्रवास',
- "Say No To Violence' असे म्हणत तरुणांनी सेल्फीची नवी स्टाईल अनुभवली.

**बदलती स्टेजरचना**

प्रत्येक सत्राचे अगदी सूक्ष्म नियोजन होते. प्रत्येक वेळी सत्राच्या गरजेनुसार स्टेजची रचना केली जात होती. सत्रानुसार नव्या रूपात पुढे येणारे स्टेज त्या सत्राची शोभा वाढवत होते. या गुलाबी वातावरणाला तरुणाईची झालर आणि प्रचंड उत्साह होता.

**पोस्टर्स**

सभागृहात प्रवेश करण्याच्या वाटेवर जोडीदाराची विवेकी निवडीचे आधुनिक निकष मानणारी पोस्टर्स लावण्यात आली होती. आकर्षक व अर्थपूर्ण चित्रांमुळे ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. अभियानाचा अर्थ नेमकेपणाने पोस्टर्समधून पोहोचत होता.

**सदरच्या संपूर्ण कार्यक्रमाचा लाईव्ह व्हिडिओ खालील लिंकवर उपलब्ध आहे .**

**https://fb.watch/qGUV2KngTp/**

शब्दांकन : हर्षल जाधव :९६३७३५१४००
गौरी जाधव : ८७७९६३८५३३

●

**विचारशलाखा**

संत व समाजसुधारकांचा मार्ग या देशात विधायक, भावनात्मक, धर्मनिरपेक्षता आणेल.

# विवेकाचा आवाज राजस्थानात

मित्र टेक्नोलॉजीज फौंडेशन, नवी दिल्ली यांच्या वतीने 'इंडिया फेलो' अंतर्गत तरुणांच्यामध्ये सामाजिक नेतृत्वगुण विकसित करण्याचा प्रयत्न अनेक वर्षे करत आहे. संपूर्ण भारतातून निवडलेल्या तरुण-तरुणींना जवळपास २१ दिवसांच्या विशेष आणि व्यापक प्रशिक्षणाद्वारे तळागाळातील समाजवास्तवाचे भान दिले जाते. हे प्रशिक्षण घेतलेले तरुण पुढे विविध सामाजिक संस्थांच्यामार्फत सामाजिक कार्य करीत असतात. आपला कार्यकर्ता सुयश तोष्णीवाल या संस्थेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांपैकी एक आहे. या संस्थेद्वारा असाच एक प्रशिक्षण कार्यक्रम उदयपूर (राजस्थान) येथील कृषि विज्ञान केंद्र येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात सहभागी तरुण-तरुणींच्यामार्फत अंधश्रद्धा निर्मूलनाचे आणि वैज्ञानिक दृष्टीकोन समाजात रुजविण्याचे कार्यदेखील केले जाऊ शकते, ही संकल्पना सुयशने प्रा. डॉ. नितीन शिंदे आणि संजय बनसोडे यांच्यासमोर मांडली. त्यावर विचारविनिमय होऊन दि. २५ आणि २६ फेब्रुवारी २०२४ रोजी उदयपूर येथे कार्यक्रम सादर करण्याचे निमंत्रण इंडिया फेलोच्या वतीने सुयशने दिले.

शिंदे सर आणि संजय बनसोडे यांनी कार्यक्रमाची आखणी केली. या कार्यक्रमासाठी स्वतः शिंदे सर, बनसोडे सर, मी (उत्तम जोगदंड), भूषण जाधव आणि संदीप जाधव यांनी जायचे ठरले. या कार्यक्रमाचा एक भाग आकाश दर्शन होता, म्हणून सोबत दुर्बिण घेऊन जाण्याचे ठरले. दुर्बिणीचा मोठा आकार आणि तिला व्यवस्थितपणे हाताळणे आवश्यक असल्याने कारनेच उदयपूरला जाण्याचा निर्णय घेण्यात आला. दिनांक २४ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेआठ वाजता आम्ही इस्लामपूर येथून निघालो. गाडीचे सारथ्य संदीप जाधव याने केले. गाडी पुणे-ठाणे मार्गाने जाणार असल्याने मला मुंबई, पुणे द्रुतगती मार्गाजवळ घेण्यात आले. मजल-दरमजल करीत, महाराष्ट्रातील ट्रॅफिक जॅमचा सामना करीत आमची गाडी २५ फेब्रुवारी रोजी सकाळी साडे दहाच्या सुमारास उदयपूरच्या 'कृषि विज्ञान केंद्र' येथे पोहोचली. स्वागताला सुयश हजर होताच. थोडी प्राथमिक चर्चा करून आणि दुपारचे जेवण घेऊन सर्वांनी विश्रांती घेतली आणि प्रवासाचा शीण घालवला. जेवण करीत असताना काही प्रशिक्षणार्थी स्वतः होऊन ओळख करून घेत होते आणि आपला कार्यक्रम पाहाण्यासाठी उत्सुक असल्याचे सांगत होते.

सायंकाळी पाच वाजता प्रशिक्षण वर्गात सर्व प्रशिक्षणार्थी जमले आणि शिंदे सरांचे 'खगोलशास्त्र आणि ज्योतिष' यावर व्याख्यान सुरू झाले. व्याख्यान इंग्रजी आणि हिंदी असे मिश्र पद्धतीने द्यायचे होते. सरांनी भाषेचा कसलाही अडथळा जाणवू न देता आपल्या नेहमीच्या खुमासदार शैलीत विषयाची मांडणी केली. हे विश्व किती अफाट आहे आणि त्यात आपले स्थान काय आहे हे पीपीटीच्या साहाय्याने दाखवून देऊन त्यांनी सुरुवात



केली. त्यानंतर नक्षत्रे, राशी, ज्योतिषातील गुण-दोष याचे विश्लेषण केले. ज्योतिष या प्रकाराची अशी तार्किक चिरफाड मुला-मुलींनी आधी अनुभवली नसल्याने ते या विषयात समरस झाले. विविध प्रकारच्या शंकांना, प्रश्नांना समर्पक उत्तरे देण्यात आली. रात्रीचे भोजन झाल्यावर आकाश दर्शन कार्यक्रम केंद्राच्या गच्चीवर घेण्यात आला. व्याख्यानात उल्लेख केलेली काही नक्षत्रे सरांनी प्रत्यक्ष आकाशात दाखवली. चंद्रावरची विवरे, गुरू ग्रह आणि त्याचे उपग्रह दुर्बिणीतून दाखवले. या संपूर्ण सत्रात भूषणने दुर्बिण हाताळली आणि ग्रह-ताऱ्यांचे दर्शन सुलभपणे करून दिले. आकाश किंचित ढगाळ असल्याने हवे तसे आकाश निरीक्षण करता आले नसले तरी, एकंदरीत सर्वांना ॲस्ट्रॉनॉमी आणि ॲस्ट्रॉलॉजी यातील फरक ठळकपणे लक्षात आला. पहाटे साडेचार-पाचच्या सुमारास पुन्हा पहाटेच्या आकाशाचे निरीक्षण करण्यासाठी सर्वांना सांगण्यात आले. मुले उत्साहाने

त्यासाठी आली; परंतु ढगाळ आकाशामुळे त्यांच्या उत्साहावर पाणी पडले.

२५ फेब्रुवारी रोजी सकाळी संजय बनसोडे यांनी 'चमत्कारामागील विज्ञान' हे सत्र सुरू केले.



कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच पाण्याचा दिवा पेटवलेला पाहून सर्वांना आश्चर्याचा धक्काच बसला. त्यानंतर सुरू झाला एक एक चमत्काराचा सिलसिला. त्यात सुयशने देखील हवेतून सोन्याची चेन काढून दाखवली आणि उपस्थित सर्वांना अवाक् केले. सर्व कथित चमत्कारांमागे विज्ञान/हातचलाखी कशी असते हे शेवटी सांगण्यात आल्यावर तर सर्वांना हसू आवरेना. अनेकांनी वेगवेगळे प्रश्न विचारले, त्याची समाधानकारक उत्तरे देण्यात आली. शेवटचा चमत्काराचा प्रयोग म्हणून बनसोडे सरांनी हातावर रुमाल ठेवला आणि तीन वेळा हुर्रे असे म्हटल्यावर तो रुमाल चमत्काराने उडेल असे सांगितले. परंतु तसे काही झालेच नाही. तेव्हा बनसोडे सर म्हणाले की, ''गेला एक दीड तास मी चमत्कार अस्तित्वात नसतो हे जीव तोडून सांगत आहे, तरीही तुम्ही चमत्कारावर विश्वास ठेवता?'' यावर हास्याचा प्रचंड स्फोट झाला. दुसऱ्या सत्रात बनसोडे सरांनी वेगवेगळे खेळ घेतले. त्याद्वारे प्रभावी संवाद, नेतृत्व गुण याविषयी मांडणी केली. त्यानंतर सामाजिक चळवळीचा इतिहास आणि सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक बाबी यावर त्यांनी विवेचन केले. बनसोडे सर प्रथमच हिंदीत संवाद साधत होते. परंतु त्यांनीही आपल्या खास विनोदी अंगाने हिंदीतदेखील तेवढ्याच प्रभावीपणे मांडणी केली. तोपर्यंत दुपारच्या जेवणाची वेळ झाली होती. जेवण झाल्यावर साडेतीन वाजेपर्यंत वेळ उपलब्ध होता. त्यावेळेत मी महा. अंनिस संघटनेविषयी माहिती दिली आणि 'वैज्ञानिक दृष्टीकोन' या विषयावर मांडणी केली. प्रशिक्षण संपवून आपआपल्या राज्यात परत गेल्यावर अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रचार-प्रसाराचे कार्य करावे असे आवाहन सर्वांना केले. दोन दिवस चाललेल्या या विवेक जागराला सर्वांनी मनापासून दाद दिली. अनेकांनी आपण खूप काही शिकलो, अशी मुक्तपणे कबुली दिली. कार्यक्रम संपल्यावर सर्वांनी मिळून ग्रुप फोटो काढला. सुयशचा निरोप घेतला आणि परतीच्या प्रवासाला निघालो.

परत येताना, देशाच्या विविध भागांतून (अगदी काश्मीर मधूनदेखील) आलेल्या, समाजसेवेचे व्रत अंगीकारलेल्या या तरुणाईसोबत संवाद साधायला मिळाला हे समाधान तर होतेच, पण महा. अंनिसचे कार्य त्यांच्यापर्यंत पोहोचवून त्यांच्यात विवेकाचा द्वीप प्रज्वलित केल्याचे समाधान त्याहून अधिक होते.

**शब्दांकन : उत्तम जोगदंड**


**दिनेश चौधरी**
**मो. ८९२८८८१९७४**

# आदित्य
## इरिगेशन



- सुप्रिम पाईप
- सर्व प्रकारचे पाईप
- प्लंबिंग फिटींग
- पी.व्ही.सी.फिटींग
- ISI & Non ISI ठिबक
- ठिबकचे सर्व साहित्य

दु.नं.१७, मार्केट कमेटी, जळगांव रोड, जामनेर

# साहस - २०२४

'धनक ऑफ ह्युमॅनिटी', दिल्ली ही संस्था आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाह करू इच्छिणाऱ्या जोडप्यांना सहकार्य करणे, कुटुंबाकडून जबरदस्तीने होणाऱ्या विवाहांना विरोध करून तरुण-तरुणींना जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य हा घटनात्मक अधिकार आहे, असे ठामपणे सांगत विविध पातळ्यांवर काम करणारी संस्था आहे. सोबतच सन २००४ पासून ही संस्था दिल्ली या ठिकाणी मानवतावादी मूल्यांचा प्रचार करणे, स्त्री-पुरुष समतेवर आधारित समाज घडविणे, जोडीदार निवडण्याच्या अधिकाराचा प्रचार करणे, वाईट रूढी-परंपरांना सोडून देणे या प्रमुख उद्दिष्टांसह समाजामध्ये जागृती निर्माण करण्याचे काम करते आहे. दरवर्षी १४ फेब्रुवारी – 'व्हॅलेंटाईन डे' या दिवशी संस्थेकडून वर्षभरात सहकार्य करण्यात आलेल्या जोडप्यांना तसेच आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाह सहकार्य करणाऱ्या देशभरातील संस्थांच्या प्रतिनिधींना साहस (SAHAS: Strengthening Alliances for Humanity And Secularism) या कार्यक्रमांसाठी निमंत्रित करते.




यावर्षीच्या कार्यक्रमासाठी महा. अंनिसच्या वतीने हर्षल जाधव (राज्य कार्यवाह, जोडीदाराची विवेकी निवड विभाग), अमृता जाधव (कार्याध्यक्षा, राधानगरी शाखा) हे सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे नेटके नियोजन करण्यात आले होते. ४० पेक्षाही जास्त जोडपी संपूर्ण देशभरातून या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. यामध्ये भिन्नलिंगी जोड्यांसह समलिंगी जोड्यादेखील सहभागी होत्या. दिवसाची सुरुवात वेगवेगळ्या मनोरंजनात्मक खेळांमधून झाली. नुक्कड म्हणजेच पथनाट्याच्या माध्यमातून स्वतः जोडीदाराची निवड करणे संविधानिक अधिकार, डिसऑनर किलिंग यांसारख्या विषयांवर प्रबोधन करण्यात आले. त्यानंतर सर्वांनी आपला थोडक्यात परिचय करून दिला. यावेळी धनक संस्थेने विवाह होण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केल्याबद्दल अनेक जोडप्यांनी आभार मानले.

दुपारनंतरच्या सत्रामध्ये दिल्ली आणि परिसरातील विविध डान्स ग्रुप्सने आपली कला सादर केली. या सत्राला प्रमुख पाहुणे म्हणून आयएएस अधिकारी विकास घाई व शिक्षणतज्ज्ञ निनाजी या लाभल्या होत्या. विकास घाई यांनी पंजाब आणि हरियाणा या ठिकाणी आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाह केलेल्या, करू इच्छिणाऱ्या जोडप्यांसाठी सरकारी पातळीवर संरक्षण गृह निर्माण करताना आलेल्या अनुभवाचे विस्तृत वर्णन केले.

समारोपाच्या सत्रामध्ये संघर्षातूनही जी जोडपी विवाहबद्ध झालीत अशा जोडप्यांना स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला; तसेच त्यांची संघर्षपूर्ण वाटचाल देखील मांडण्याची संधी त्यांना देण्यात आली. स्मृतिचिन्ह स्वीकारताना हर्षल जाधव यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहबद्दलच्या कार्याचा आढावा सांगितला. आतापर्यंत बाराशेपेक्षाही जास्त विवाह समितीने लावल्याचे सांगण्यात आले. तसेच जोडीदाराची विवेकी निवड या उपक्रमाबद्दल ही माहिती सांगण्यात आली. एकूणच समितीच्या कार्याचे कौतुक उपस्थित सर्व मान्यवरांनी केले.

धनक संस्था आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती गेल्या अनेक वर्षांपासून चयन या नावाने देशभरातील विवेकवादी संघटनांचा समूह म्हणून एकत्र काम करत आहेत.

**शब्दांकन : अमृता जाधव**
७०२८६१९५८१

●



# महा. अंनिसची खबरबात

**अनिल शोभना वसंत** । पालघर
९८२३२८०३२७

**जिल्हा बैठक**

**आकुर्डी :** न्यू इंग्लिश स्कूल, पिंपरी चिंचवड येथे दि.१८ फेब्रुवारी २०२४ रोजी जिल्हा बैठक संपन्न झाली. स्वागत, प्रास्ताविकानंतर राज्य पदाधिकारी, शाखा पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांची मनोगते झाली. संघटनात्मक कामासंदर्भात सविस्तर चर्चा झाली. सदर बैठकीमध्ये ज्ञानेश महाजन, अतिश शिंदे, विकास सूर्यवंशी, गणेश तामचीकर, विशाल विमल, पल्लवी सवाखंडे, प्रज्ञा सवाखंडे, बाळासाहेब गस्ते, विनोद लातूरकर, सुनील बाबर, अतुल सवाखंडे, आशपाक पिंजार, बसप्पा कनजे, दर्शन देवकांत, संजय बारी, एकनाथ पाठक, मनीषा महाजन, रमेश महाजन, सम्यक वि. म., भावना फुलझेले, मनोहर पाटील, संजय निकम, चंद्रकांत कोचरे आदींनी सहभाग घेतला. सदर बैठकीसाठी निरीक्षक म्हणून राज्य प्रधानसचिव डॉ. ठकसेन गोराणे आणि अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे कार्यकारी संपादक उत्तम जोगदंड उपस्थित होते.

**आकाशदर्शन अभियान**

**करवीर :** करवीर शाखा आणि संस्कार क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने गॅलिलिओ (१५ फेब्रुवारी) यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून कणेरी येथे आकाशदर्शन उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमासाठी खगोल अभ्यासक किरण गवळी प्रमुख मार्गदर्शक होते. यावेळी किरण गवळी यांनी स्लाईड शोच्या माध्यमातून विश्वाचा पसारा त्याची उत्पत्ती तसेच आकाशातील ग्रह, तारे, राशी, नक्षत्र, ग्रहणे, उल्कापात यांची माहिती समजावून सांगितली. यावेळी दुर्बिणीतून सर्वांनी चंद्र पाहाण्याचा आनंद घेतला. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिपूरकर यांनी मनोगत व्यक्त केले. रामदास देसाई यांनी प्रास्ताविक तर प्रमोद शिंदे यांनी आभार मानले. संस्कार क्लासेसच्या अंकिता पाटील, अंनिसचे मोहित पोवार, निशांत शिंदे, मुक्ता निशांत, विष्णू पाटील, महादेव पाटील, सरिता यमगर, सुषमा देसाई तसेच नागरिक व मुले उपस्थित होते.

**वारसा संतांचा, अंधश्रद्धा निर्मूलनाचा**

**वाशीम :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गुगुळ पिंपरीच्या प्रांगणामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन आणि 'वारसा संतांचा, अंधश्रद्धा निर्मूलनाचा' हे अभियान राबवण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी सहप्रयोग उद्‍बोधन करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक महा. अंनिस शहर शाखेचे कार्याध्यक्ष पी. एस. खंदारे, शिवश्री सुभाष पोळकर, शिवश्री विजयराव शिंदे, किशोर हनवते, भाऊ शिंदे, दत्ता लहाने, उद्धवराव रणबावळे इत्यादी उपस्थित होते. संतांच्या विचारांचे अनेक बॅनर, पोस्टर प्रदर्शन भरवण्यात आले होते. चळवळीच्या गीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

**बोईसर :** या अभियानांतर्गत शाखेतर्फे पोस्टर प्रदर्शन आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यावर्धिनी कॉलेज, वसई आणि माकुणसार दत्त मंदिर प्रतिष्ठानतर्फे आयोजित या कार्यक्रमास चांगला प्रतिसाद लाभला. महा.अंनिस पालघर जिल्ह्याचे कार्याध्यक्ष आप्पा लोखंडे यांनी महा.अंनिसच्या कार्याची माहिती सांगितली. त्यानंतर राज्यकार्यवाह अनिल शोभना वसंत यांनी श्रद्धा, अंधश्रद्धा, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि संतांचे अंधश्रद्धा निर्मूलनाचे विचार यांविषयी सप्रयोग मांडणी केली.

**आडगाव सरक :** या अभियानांतर्गत शेंद्रा रायझिंग इंग्लिश स्कूल, कुभेफळ येथे चमत्कार सादरीकरण व त्या पाठीमागील विज्ञान याविषयी भाऊसाहेब पठाडे यांनी मार्गदर्शन केले. याठिकाणी संतांचे पोस्टर प्रदर्शन, व्यसनमुक्तीचे पोस्टर प्रदर्शनदेखील होते. पत्रकार आबासाहेब पठाडे, ज्येष्ठ शेतीतज्ज्ञ भाऊसाहेब पाटील-शेळके, संस्थाचालक संजयराव तायडे, संस्थेच्या अध्यक्षा सौ. आशा तायडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**राष्ट्रीय विज्ञान दिन**

**शहादा :** शाखेमार्फत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. त्यासाठी शहादा तालुक्यातील प्रत्येक शाळेतून पाच विद्यार्थी व एक विज्ञान शिक्षक यांचे प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना विज्ञान गीत, २८ फेब्रुवारी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व सांगणारे भाषण, विज्ञानातील छोटे छोटे दहा प्रयोग, विज्ञानावर आधारित एक विज्ञान नाटिका याचं प्रशिक्षण देण्यात आले व याच विद्यार्थ्यांनी शाळेत पुढील चार ते पाच दिवस सराव

करून २८ फेब्रुवारी रोजी आपापल्या शाळेमध्ये हा कार्यक्रम सादर केला. विद्यार्थ्यांनी त्यांचा कार्यक्रम सादर केल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला सहभागाचे 'विज्ञान दूत' म्हणून प्रमाणपत्र देण्यात आले. ज्या शिक्षकाने विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतलं होतं, त्या शिक्षकांनादेखील 'विज्ञान दूत' म्हणून प्रमाणपत्र देण्यात आले. शहादा तालुका मुख्याध्यापक संघ, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व पंचायत समिती शिक्षण विभाग, शहादा यांच्या संयुक्तपणे हा कार्यक्रम आयोजित केला होता. विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

**पालघर :** विज्ञान दिनानिमित्त पी. एल. श्रॉफ कॉलेज, चिंचणी येथे 'वैज्ञानिक दृष्टीकोन' या विषयावर पालघर अंनिसतर्फे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रमिला राऊत, सुचिता करवीर, प्रेरणा राऊत, अष्टेकर मॅडम, ज्ञानेश्वर भोसले यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

**वर्धा :** शाखा व वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभागातर्फे राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने दि. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी 'चमत्कार प्रशिक्षण शिबिर' घेण्यात आले. प्रारंभी जगजीवनराम विद्यालयाचे मुख्याध्यापक भावेकर सर यांच्या हस्ते पाण्याने दिवा पेटवून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. राज्य प्रधानसचिव गजेंद्र सुरकार, नवभारत अध्यापक विद्यालयाचे प्रा. वंदना बाराई, प्रा. श्रावण राठोड, प्रा. अभय मकेश्वर, पुंडलिक नागतोडे, तनु वराडे इ.उपस्थित होते. वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभागाचे राज्य सहकार्यवाह प्रकाश कांबळे यांनी विज्ञान गीत सादर करून दोन प्रयोग समजावून सांगत त्यामागील विज्ञान, हातचलाखी काय आहे याचा उलगडा करून दाखविला. गजेंद्र सुरकार, निखिल सुशीला मोरेश्वर यांनीही विविध प्रयोग विद्यार्थ्यांकडून करवून घेतले. यावेळी प्रा. वंदना बाराई यांनी मनोगत व्यक्त केले. शिबिरात वर्धा शहरातील दहा शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. गजेंद्र सुरकार यांनी तलमले औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, वर्धा आणि प्रकाश कांबळे यांनी स्वावलंबी विद्यालय, वर्धा येथे विविध चमत्काराचे प्रयोग समजावून सांगितले आणि विज्ञान दिनाचे महत्त्वही विद्यार्थ्यांना सांगितले.

**गडचिरोली :** शाखेतर्फे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा व शासकीय माध्यमिक आश्रमशाळा रांगी येथे महा. अंनिसचे वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पचे राज्य सहकार्यवाह विलास निंबोरकर व जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठलराव कोठारे यांच्या उपस्थितीत विज्ञान दिन साजरा करण्यात आला. आलापल्ली शाखेतर्फे पेरमीली येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत कार्याध्यक्ष संतोष चिकाटे यांच्या उपस्थितीत विज्ञान दिन साजरा करण्यात आला. गट साधन केंद्र, चामोर्शी येथे शिक्षकांचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्याप्रसंगी प्रधानसचिव शिवराम मोगरकर यांनी विविध प्रात्यक्षिके सादर करून वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्यासाठी प्रयत्न केला. सर सी. व्ही. रमण यांच्या कार्याविषयी माहिती दिली.

**घोट :** शाखेतर्फे जवाहर नवोदय विद्यालय व कॉन्व्हेंट नवोदय प्राथमिक विद्यालय, घोट येथे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. शाखेचे कार्याध्यक्ष आसिफ सय्यद यांनी यासाठी पुढाकार घेतला. नवेगाव मुरखडा येथील संजीवनी उच्च प्राथमिक शाळा तथा हायस्कूल व बोदली येथील शंकरराव मल्लेलवार हायस्कूल येथे महा.अंनिसच्या वतीने आयोजित प्रशिक्षणासाठीआलेल्या विद्यार्थ्यांनी प्रयोग करून दाखविले व त्यामागील कार्यकारणभाव समजावून सांगितला. तसेच सर सी. व्ही. रमण यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकले.

**मंडणगड :** दळवी एज्युकेशन आणि चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महाराष्ट्र पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या वतीने आणि महा.अंनिस मंडणगड यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या अनुषंगाने 'तर्कशुद्ध विचार' या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मंडणगड शाखेचे माजी अध्यक्ष राजेश समेळ यांनी वैज्ञानिक दृष्टीकोन विद्यार्थ्यांना समजावून सांगताना त्यांनी श्रद्धा-अंधश्रद्धा म्हणजे काय, वैज्ञानिक दृष्टीकोन, अंगात येणे-भानामती वा भूतबाधा, फलज्योतिषशास्त्र का नाही याविषयी सखोल मांडणी केली. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ऐश्वर्या कांबळे यांनी तर आभार प्रा. दरेकर यांनी मानले.

**लासूर :** राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शारदा विद्यामंदिर, माळी वाडगाव येथे महा. अंनिस लासूर स्टेशनच्या वतीने 'चमत्कारामागील विज्ञान' या विषयावर सप्रयोग व्याख्यान व बालवैज्ञानिकांनी बनविलेल्या प्रयोगाचे मूल्यमापन महा. अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष भास्कर बनसोडे यांनी केले. या प्रकल्पात जवळपास ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. विशेष म्हणजे 'टाकाऊतून टिकाऊ' व 'वैज्ञानिक तत्त्व' या दोन निकषांवर अतिशय मेहनतीने हे प्रयोग सादर केले. त्यानंतर बनसोडे सरांनी नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ सर सी. व्ही. रमण व राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व प्रतिपादन

केले.

**खराशी :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त 'प्रश्न मुलांचे उत्तर महा. अंनिसचे' याविषयी कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला बुवाबाजी विभाग राज्य सहकार्यवाह विष्णुदास लोणारे, नितेश बोरकर, मुख्याध्यापिका सौ. वनिता खराबे, स.शिक्षक योगीराज देशपांडे, सतीश चिंधालोरे, सुनील भरणे, सौ. पायल वंजारी, सौ. कौशल्या आठोडे, प्रा. युवराज खोब्रागडे उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त मुलांनी शाळेत लावलेल्या वैज्ञानिक प्रदर्शनीचे निरीक्षण करण्यात आले. त्यानंतर खराशी येथे महा.अंनिसची शाखा स्थापन करण्यात आली. या शाखेचे अध्यक्ष युवराज निंबाळते, उपाध्यक्ष सुभाष ढोके, उपाध्यक्ष माधुरी सुखदेव, कार्याध्यक्ष तुषित गजभिये, प्रधानसचिव मधुमाला सुखदेव, बुवाबाजी विभाग मनोहर मेश्राम, विविध उपक्रम हेमराज निंबाळते, वैज्ञानिक जाणीव महादेव गौरे, सदस्य गणेश शेंडे, प्रतिभाताई बोरकर, सुभाष पडोळे, राजेश बावणे, भूपेश झलके, सुभाष बावणे अशाप्रकारे कार्यकारिणी गठीत करण्यात आली.

**सानपाडा :** शाखेतर्फे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त दि.१६ फेब्रुवारी २०२४ रोजी वाशी येथील श्री 'नवी मुंबई विद्यालय' येथे 'चमत्कारामागील विज्ञान' या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. चमत्कारांमागील विज्ञान, तंत्र व हातचलाखी प्रात्यक्षिकांसह उलगडून दाखविण्यात आले. महा.अंनिस. कार्यकर्ते राजेंद्र पंडित, गजानंद जाधव, सचिन बुधकर, कैलास झिने व अशोक निकम यांनी सक्रिय सहभागातून कार्यक्रम सादर केला.

**जळगाव :** शाखेमार्फत संत गाडगेबाबा जयंती आणि राष्ट्रीय विज्ञान दिन मानव सेवा विद्यालय, जळगाव येथे साजरा करण्यात आला. यावेळी आनंद ढिवरे, दिगंबर कट्यारे, गिरीश जाधव हे महा. अंनिस कार्यकर्ते आणि मुख्याध्यापिका प्रतिभा सूर्यवंशी व शिक्षक उपस्थित होते.

**पाचोरा :** श्री. गो.से. हायस्कूल, पाचोरा येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त चमत्कारामागील विज्ञान हा कार्यक्रम सादर करण्यात आला महा.अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र चौधरी यांनी विविध चमत्कार करून दाखवले आणि त्यामागील विज्ञान स्पष्ट केले.

**पुणे :** राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त महा.अंनिस पुणे शहर शाखेने 'जीवन समृद्ध करणारा वैज्ञानिक दृष्टीकोन' हे अभियान आयोजित केले होते. हे अभियान १९ ते २९ फेब्रुवारी २०२४ या काळात राबविण्यात आले. या अभियानांतर्गत प्रश्नमंजुषा, विज्ञान विचार पोस्टर प्रसार, प्रात्यक्षिकासह व्याख्यान कार्यक्रम झाले. प्रात्यक्षिकासह व्याख्यानाचे ८ कार्यक्रम झाले. त्यात २५०० विद्यार्थी सहभागी झाले होते. कौशल्य आणि बुद्धिमत्ता वापरून त्याआधारे प्रत्यक्षात २५००, सोशल मीडियातून ११२२७ नागरिकांचे प्रबोधन घडवून आणले गेले.

**भंडारा :** श्री.नरेंद्र तिडके कला, वाणिज्य महाविद्यालय, रामटेक यांच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विविध वैज्ञानिक प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रा.स्वप्निल मनघे होते. या प्रसंगी समितीच्या कार्याध्यक्षा दीपा चव्हाण, सौ.दुर्गा लोंढे, सौ.शोभाताई राऊत, शुभा थुलकर, सरला नाईक, गंगा टेंभुर्णे उपस्थित होते. दीपा चव्हाण यांनी विविध वैज्ञानिक प्रयोगांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे संचालन करण गाडेकर यांनी, तर परिचय अनुराग चांदेकर यांनी करून दिला. आभार दीक्षा बारई हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गायत्री सरोदे, टिनू कावरे, तृप्ती वाडिभस्मे, पुरंदर बनसोडे, करिश्मा हटवार यांनी परिश्रम घेतले.

**लिंबू-मिरची तोडा, विज्ञानाशी नाते जोडा.**

**धाराशिव :** अंनिसच्या वतीने विज्ञान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शाळा-कॉलेजमध्ये विज्ञानाविषयी गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने चमत्कारामागील विज्ञान सप्रयोग दाखवण्यात आले. तसेच विज्ञान प्रश्नमंजुषा घेण्यात आली. धाराशिव बसस्थानक परिसरात ऑटोरिक्षावाले यांच्यासोबत 'लिंबू-मिरची तोडा विज्ञानाशी नाते जोडा' हे अभियान राबविण्यात आले. या कार्यक्रमात ॲड. तनुजा हेडा, निलेश राऊत, अब्दुल लथीफ, ॲड. अजय वाघाळे, गणेश वाघमारे, ॲड. बाळासाहेब जाधव, सुरेश शेळके, शहर वाहतूक पोलीस प्रभाकर कांबळे व त्यांचे सहकारी, तसेच परिसरातील व्यावसायिक, ऑटोरिक्षा चालक उपस्थित होते.

**नाशिक :** राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त कामगार नगर सातपूर येथे 'लिंबू-मिरची तोडा, विज्ञानाशी नाते जोडा' हे अभियान राबविण्यात आले.

**निमगुळ :** शाखेमार्फत दिलीप खिवसरा यांनी मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन जागृत व्हावा, यासाठी लिंबू-मिरचीबाबत प्रबोधन व चमत्काराचे प्रयोग करून त्यामागील विज्ञान, हातचलाखी बाबतीत माहिती दिली. त्यानंतर प्राचार्य आर. पी. सोवे यांनी वैज्ञानिक दृष्टीकोन विकासाचा पाया आहे, तो समाजात राबवण्याचा प्रयत्न करू असे सांगितले. शेवटी 'जय जवान, जय किसान, जय विज्ञान'

अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी एस. व्ही. भदाने, ए. एन. साळुंखे, एस. डी. मोरे, पी. ए. अहिराव, जे. डी. पाटील व विद्यार्थी उपस्थित होते.

**अलिबाग :** विज्ञान दिनानिमित्त महा.अंनिस अलिबाग शाखेतर्फे 'लिंबू-मिरची तोडा विज्ञानाशी नाते जोडा' हे अभियान राबविण्यात आले.

**प्रबोधनात्मक कार्यक्रम**

**चंद्रपूर :** जिल्ह्यातील वढा येथे 'वैज्ञानिक दृष्टीकोन व अंधश्रद्धा निर्मूलन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला अध्यक्ष आर. बी. वानखेडे (प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र संस्था, चंद्रपूर), मुख्य मार्गदर्शक पी. एम. जाधव (जिल्हा कार्याध्यक्ष), बंडोपंत बोढेकर (ग्रामगीताचार्य तथा कार्यक्रम अधिकारी), प्रमुख अतिथी विशाल रामेडवार (सर्पमित्र) देवराव कोंडेकर, नारायण चव्हाण, दुर्गेंद्र गेडाम यांची उपस्थिती होती. यावेळी पी. एम. जाधव यांनी चमत्कारामागील विज्ञान व अंधश्रद्धा निर्मूलनावर मार्गदर्शन केले.

**फिरते नभांगण**

**अंबाजोगाई :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वांगजी आणि जवाहर विद्यालय आशिव येथील विद्यार्थ्यांनी शारदा इंग्लिश स्कूल, लातूर येथे जाऊन विज्ञान बोध वाहिनीच्या वतीने आयोजित केलेल्या फिरत्या नभांगणाचा अनुभव घेतला. यामध्ये विद्यार्थ्यांनी पृथ्वीची निर्मिती, ग्रहताऱ्यांची माहिती, मानवाचा विकास आदी बाबतची माहिती घेतली. वांगजी शाखेचे कार्याध्यक्ष विनोद डाके यांनी विद्यार्थ्यांना ही संधी उपलब्ध करून दिली.

**संवाद कार्यशाळा**

**कोल्हापूर :** विवेक वाहिनी (डी.आर.माने महाविद्यालय, कागल) आणि महा.अंनिस कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने व्हॅलेंटाईन डे च्या निमित्ताने 'जोडीदाराची विवेकी निवड' या विषयावर संवाद कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्या डॉ. नीला जोशी होत्या. जोडीदाराची निवड कशी करावी? प्रेम म्हणजे काय? प्रेम आणि आकर्षण यातील फरक अशा विविध विषयांवर रेश्मा खाडे, स्वाती कृष्णात, हरी आवळे यांनी संवाद साधला. स्वागत आणि प्रास्ताविक डॉ. लखन भोगम यांनी तर पाहुण्यांचा परिचय डॉ. संतोष जेठीथोर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संदीप वाडीकर यांनी, तर आभार प्रा. विनायक जाधव माळी यांनी मांडले.

**स्मशानभूमी सहल**

**कुर (ता. भुदरगड) :** अंनिस शाखा मुरगूड आणि भुदरगड यांच्यावतीने स्मशानभूमी सहल आयोजित केली होती. या सहलीसाठी युवक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने हजर होते. कुर गावचे लोकनियुक्त सरपंच मदन पाटील, पोलीस पाटील युवराज धोंगडे, ग्रामपंचायत सदस्य खाडे, हळदकर सर, करवीर अंनिस शाखेच्या प्रधानसचिव स्वाती कृष्णात, भुदरगड अंनिस शाखेचे कार्याध्यक्ष आनंद पाटील, पं. स. माजी सभापती आशा नलवडे, मुरगूड शाखेच्या स्मिता कांबळे, कोल्हापूर शाखेचे अभिषेक श्रीराम आदी प्रमुख उपस्थित होते. मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. अंधश्रद्धा आणि समाजातील चालीरीती यावर चर्चा करण्यात आली. या स्मशानभेटीच्या नियोजनाकरिता अंनिस राज्य सरचिटणीस कृष्णात स्वाती, मुरगूड शाखेचे कार्याध्यक्ष शंकर दादा कांबळे यांचे सहकार्य लाभले. याबरोबरच अंनिसचे अमोल, कृष्णा, शृतिक, शिवराज, रेश्मा खाडे, प्रज्योत आदी कार्यकर्ते या स्मशान भेटीसाठी कार्यरत होते. युवराज धोंगडे यांनी आभार मानले.

**लव्ह आजाद है**

**पनवेल :** ७ ते १४ फेब्रुवारी दरम्यान पनवेल शखतर्फे 'लव आझाद है' हे अभियान, सोशल मीडिया माध्यमातून, युवा सहभाग विभाग आणि 'जोविनि' विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात आले. प्रेम ही अत्यंत नैसर्गिक भावना आहे; पण हल्ली, या भावना व्यक्त करण्यासाठी समाजातून अनेक अंगाने विरोध होताना दिसतो. तसेच मागील काही वर्षे लव्ह-जिहादच्या नावाने प्रेम आणि जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य संकुचित केलं जात आहे. यालाच अनुसरून आणि प्रेमाला अनेक अंगाने समजून घेण्यासाठी आणि व्यक्त होण्यासाठी हे अभियान राबवले गेले. या अभियानांतर्गत १२ फेब्रुवारी रोजी ऑनलाईन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अमुक-तमुकचे सहसंस्थापक ओमकार जाधव यांना प्रमुख वक्ता म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

**भरारी आत्मसन्मानासाठी**

**वर्धा :** स्त्रिया आणि युवतींच्यासाठी २ व ३ मार्च रोजी आयोजित केलेले शिबिर उत्साहात पार पडले. उद्घाटक सुषमाताई तसेच काळे मॅडम, पूजा ताई आणि मालती ताई या सर्वांनी आपल्या विचारात भर टाकण्याचे काम केले. माधुरी ताई आणि आपल्या महिला कार्यकर्त्यांच्या टीमने या शिबिरात जिवंतपणा टिकवून ठेवला. कुणाचीच गैरसोय होऊ नये याची काळजी घेतली. एकूण ४१ महिला व तरुणींनी यात सहभाग घेतला होता.

•

सूरज उर्मिला सुनील

**शून्य**

विराटने दुकानातून पेन विकत घेतला. ''हा माझा नवीन पेन! सेलो!'' विराट म्हणाला. सेलोला खूप आनंद झाला. आपल्याला मालक मिळालाय! मी आता भरपूर लिहिणार!, पण... सेलोची निराशा झाली. विराट हा अभ्यासात ढ मुलगा होता. त्याला लिहायला आवडत नव्हतं. तो रोज शाळेत जायचा, पण दिवसभरात विराट सेलोकडून फक्त एक-दोन वाक्ये लिहून घ्यायचा. नुसतं बॅगेतच पडून राहिल्यामुळे सेलोची पुस्तकं, कंपासपेटी, पेन्सिल, रबर यांसोबत ओळख झाली. पुस्तकांकडून सेलोला भाषा, विज्ञान, गणित, इतिहास अशा गोष्टी कळू लागल्या. अभ्यास न केल्याने विराटला शिक्षक मारायचे, तेव्हा ही मंडळी जल्लोष करायची.

''एक जोक सांगू का?'' सेलोने विचारलं. ''मला सांगा, विराटला गणितातील एक शब्द द्यायचा असेल तर कोणता देणार?'' ''कोणता?'' सगळ्यांनी विचारलं. ''शून्य! कारण त्याला कुणी भावच देत नाही.'' जोरदार हशा उसळला. तिथून पुढे विराटचे टोपणनाव 'शून्य' असे पडले. नवीन वर्ष सुरू झालं आणि नवीन पुस्तकं बॅगेत आली. सगळे गप्पा मारू लागले. इतिहासाने विचारलं, ''आपला मालक दिसला नाही अजून, त्याचं नाव काय आहे?'' पेन्सील म्हणाली, ''विराट, आम्ही त्याला शून्य म्हणतो.'' त्यावर गणिताचे पुस्तक म्हणाले, ''अरे वा! भारी आहे की आपला मालक!'' गणिताचं बोलणं ऐकून सगळे चक्रावले. सेलोने त्याला विराटच्या तक्रारी सांगितल्या. त्यावर गणित म्हणाले, ''विराट कसा आहे हे मला माहिती नाही; पण शून्य मात्र बिनकामाचा अजिबात नाही.'' सगळ्यांना अजूनही प्रश्न होता. गणित पुढे म्हणाले, ''थांबा, तुम्ही हे वाचा.'' त्याने त्याच्याकडील काही पाने दाखवली. रबर मोठ्याने वाचू लागले,

X+0=X; X-0=X

''बघ, म्हटलेलं ना बिनकामाचा आहे म्हणून?''

''थांब रे, अजून पुढं वाच.''


0 x X=0; 0÷X=0; X÷0 हे अनिश्चित असते.

गणित म्हणालं, ''बघा मित्रांनो, शून्य बिनकामाचा नाहीये, तर तो फक्त वेगळा आहे. त्याच्याकडे इतरांपेक्षा वेगळे आणि परिणामकारक गुण आहेत. त्यामुळे त्याला गणितात खूप महत्त्व आहे. शून्याचा शोध लागल्यापासून जगाच्या विकासाचा वेग वाढला. त्यामुळं त्याच्या वेगळेपणाचा आपण आदर करायला हवा.''

हे सगळ्यांनाच नवं होतं. सेलो विचारात पडला. आजपर्यंत आपण समजत होतो ती गोष्ट वेगळीच निघाली. विराटबद्दल असं असू शकतं का? त्याने शोध घ्यायचं ठरवलं. लपूनछपून विराटचे निरीक्षण करताना त्याला कळलं की, हा तर खूप सुरेल गातो! हा एकटा असतानाच गातो! असं का बरं असेल? सेलोला प्रश्न पडला; पण त्यालाच उत्तर जाणवलं. 'विराटची 'ढ मुलगा' अशी ओळख आहे. त्याचा त्याला न्यूनगंड असणार. बॅगेतल्या सर्वांनाच विराटबद्दल सहानुभूती वाटायला लागली. तेथून पुढे तो जेव्हा मार खायचा तेव्हा सगळ्यांना वाईट वाटायचं. एके दिवशी शिक्षकांनी घोषणा केली, ''आपल्या शाळेत उद्यापासून वक्तृत्व, चित्रकला, गायन, वादन अशा स्पर्धा होणार आहेत. इच्छुकांनी आजच नावे द्या.'' हे ऐकताच बॅगेतल्या सर्वांना विराटने या स्पर्धेत भाग घ्यावा असं वाटलं. पण त्यांना भीती होती. ''विराटने स्पर्धेसाठी नावच नाही दिलं तर? आपण त्याचं नाव स्पर्धेसाठी देऊया.'' सेलो म्हणाला, ''पण कसं?''

सेलो बॅगेच्या बाहेर आला. मधली सुट्टी असल्याने सर्वजण खेळायला गेले होते. सेलोने वहीकडून कागद घेतला. त्यावर 'विराट, गायन स्पर्धा' असं लिहिलं. पेन्सिलीच्या मदतीने कागदाची घडी घातली. उड्या मारत जाऊन त्याने टेबलावर कागद ठेवला. तोपर्यंत घंटा वाजली. पटकन उडी मारत तो बॅगमध्ये शिरला. सेलोच्या चेहऱ्यावर समाधान झळकलं. उद्या विराटमधला 'शून्य' सगळ्यांना दिसणार आहे. त्याच्यातल्या शून्यामुळेच त्याचा स्वतःवरचा आत्मविश्वास वाढणार आहे.

**कोडे क्र. १५**




गोळाफुलीचा खेळ सगळ्यांना माहित असेल. शेजारील चित्रात खेळाच्या पहिल्या तीन स्टेप्स झालेल्या आहेत. आता जर O ला जिंकायचं असेल तर त्याने A, B, C, D यापैकी कोणत्या जागी खेळायला हवं?

**कोडे क्र. १४ चे उत्तर :** Z=1, E=3, R=4, O=6, N=7

बरोबर उत्तर देणारे गणितप्रेमी

**किशोर वानखेडे** (वर्धा)

**बी. आर. पाटील** (फत्तेपूर)

# विवेक–विज्ञान शब्दकोडे क्र. २०

– उत्तम जोगदंड

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ■ | २ | | | | | | | ३ |
| | ■ | | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | |
| ४ | | | ■ | ५ | ६ | | ७ | | ■ |
| | ■ | | ■ | ८ | | ■ | | ■ | ९ |
| | ■ | | ■ | | ■ | १० | | | |
| ■ | ११ | | | | | ■ | | ■ | |
| १२ | ■ | | ■ | ■ | ■ | १३ | ■ | १४ | |
| १५ | | | | १६ | | | | ■ | ■ |
| | ■ | | ■ | | ■ | | ■ | १७ | १८ |
| ■ | १९ | | | | ■ | २० | | | |

**आडवे शब्द**

२) आपल्या पत्नीस सोबत घेऊन भारतात प्रथमच स्त्रियांना शिक्षण देणे सुरू करणारे महापुरुष.

४) आकाशात उत्तरेकडे दिसणाऱ्या सात तारकांच्या समूहाला दिलेले नाव.

५) कधीही न संपणारी सौर–पवन ऊर्जा.

८) कोणत्याही जीवाचा जन्मापासूनचा कालावधी.

१०) पाच बाजू असलेली भूमितीमधील आकृती.

११) भारताचे पहिले अंतराळवीर.

१४) तोंडात घेतलेला घास याने चावून बारीक केला जातो.

१५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा त्यांच्या हयातीत यांनी उभारला.

१७) एक केंद्रशासित प्रदेश.

१९) भूपृष्ठावरील किंवा त्यांच्या जवळील बिंदू, रेषा आणि प्राकृतिक स्वरूपे यांच्यातील परस्परसंबंधाचे मापन.

२०) निसर्गातील सजीवांचा अभ्यास करणारे विज्ञान.

**उभे शब्द**

१) महा. अंनिसच्या मानसिक आरोग्य विभागातर्फे प्राथमिक समुपदेशन करणारा कार्यकर्ता.

२) हिंगणे येथे झोपडीत मुलींची शाळा सुरू करणारे, स्त्रीशिक्षणासाठी जीवन समर्पित करणारे थोर समाजसेवक.

३) धातूंना घासून वेगवेगळे आकार देण्यासाठी वापरले जाणारे यंत्र.

५) अंतराळ.

६) थुंकीतून, शिंकण्यातून पसरणारा एक रोग.

७) जलउपसा.

९) परभणी जिल्ह्यातले १९७०च्या दशकात नरबळीसाठी कुप्रसिद्ध झालेले एक गाव.

१२) डॉ. बाबासाहेबांच्या पत्नी, त्यागमूर्ती माता ***

१३) भोंदू बुवा, बाबा ही करून भोळ्या जनतेला फसवतात.

१६) रस्त्याची बदललेली दिशा.

१७) सूर्योदयाकडे किंवा ध्रुव ताऱ्याकडे पाहून आपण ही ठरवतो.

१८) मानवाच्या तीन मूलभूत गरजांपैकी एक.

(उत्तर पुढील अंकात)

**विवेक–विज्ञान शब्दकोडे क्र.१९ चे उत्तर**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १अ | ले | क्झां | २ड | ३र | ग्रॅ | हॅ | ४म | बे | ५ल |
| णू | ■ | ■ | ६च | व | ■ | ■ | म | ■ | लि |
| ■ | ७अ | ८क्ष | ■ | ■ | ९त | डि | ता | ■ | ता |
| १०ऑ | र्थ | र | सी | ११क्ला | र्क | ■ | बॅ | ■ | बा |
| ■ | शा | ■ | ■ | रा | ■ | १२कि | न | खा | ब |
| १३शा | स्त्र | ज्ञ | ■ | १४झे | ब्रा | ■ | र्जी | ■ | र |
| र्क | ■ | ■ | १५ला | ट | ■ | १६स | ■ | १७नि | ■ |
| ■ | १८ओ | ■ | ■ | कि | ■ | म | ■ | १९वा | फ |
| ■ | २०ह | र | २१म | न | प्री | त | कौ | र | ■ |
| २२गो | म | ■ | न | ■ | ■ | ल | ■ | २३क | र्क |

# महा. अंनिसचे विविध उपक्रम...




वढा (चंद्रपूर) येथे वैज्ञानिक दृष्टीकोन व अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर मार्गदर्शन करताना जिल्हा कार्याध्यक्ष पी.एम.जाधव



वाशिम येथे वैज्ञानिक दृष्टीकोन व सप्रयोग सादरीकरण करताना शाखा कार्याध्यक्ष पी.एस.खंदारे



राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त 'प्रश्न मुलांचे उत्तर महा. अंनिसचे' या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना राज्य सहकार्यवाह विष्णूदास लोणारे



नाशिक येथे 'लिंबू-मिरची तोडा, विज्ञानाशी नाते जोडा' हे अभियान राबवताना डॉ. ठकसेन गोराणे



वर्धा येथे भरारी आत्मसन्मानासाठी शिबीर संपन्न



संत गाडगेबाबा जयंती आणि राष्ट्रीय विज्ञान दिन मानव सेवा विद्यालय, जळगांव येथे साजरा करण्यात आला




पिंपरी चिंचवड येथे पुणे जिल्हा बैठक संपन्न




सानपाडा येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त चमत्कारामागील विज्ञान सप्रयोग सादरीकरण करताना राजेंद्र पंडित व अशोक निकम

ISSN : 2584-0398 Registered News Paper
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-GR/SAN/104/2023-2025
R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd. No. SGL/144/2023-2025
Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409 Published and Posted on 5th of Every Month.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष तिसरे अंक चौथा, ५ एप्रिल २०२४ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/-
Andhshradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 3 Issue 4, 5th April 2024 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

विज्ञान निर्भयता नीती

ISSN : 2584-0398

R.N.I.No. MAHMAR/2022/83669

**वर्षभरात विशेषांकासह ११ मासिक अंक मिळवा घरपोच**

**बँक तपशील**

वर्गणी/जाहिरात/देणगीचा चेक/ड्राफ्ट/RTGS/NEFT/ऑनलाईन पेमेंट
**'विवेक जागर संस्था'** या समितीच्या प्रकाशन संस्थेच्या नावानेच काढावा.

सोबतचा QR कोड स्कॅन करुन
जाहिरातदार/देणगीदार/वर्गणीदार होऊ शकता

Scan & Pay

**VIVEK JAGAR SANSTHA**
ICICI Bank, Mundada Market, Dhule
A/c No.: 646301002757
IFSC Code : ICIC0006463
PAN : AADTV0009R



वार्षिक वर्गणीदार व्हा!
व्यक्तीसाठी रु. ४००/-
संस्थेसाठी रु. ५००/-

- संपर्क - व्यवस्थापकीय संपादक : अजय भालकर (९३५९०८०८२०) अंक वितरक : आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
- सहकाऱ्यांना मासिकाचे वर्गणीदार व वाचक बनवा तसेच जाहिरात व देणगीरूपाने मदत करा.
- प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टाने अंक रवाना केला जातो. अंक १५ तारखेपर्यंत न मिळाल्यास संपर्क करा.
- अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामामध्ये आपला सहभाग सर्व पातळीवर वृद्धिंगत व्हावा हीच अपेक्षा.
- अंकासाठी लेखन साहित्य manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in या ईमेलवर पाठवावे.

**कार्यालयीन पत्ता**

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली - ४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in

**Printed Book Post**

**प्रेषक,**
अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

**प्रति,** ______________________

______________________

______________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.